लातूर
# भूकंप
LATUR BHUKAMP
संपादक: अशोक चिंचोले

सांज दैनिक : शनिवार - २ सप्टेंबर २०२३
वर्ष - ३७ वे
अंक - १५२
पाने - ४
E-Mail : dailybhukamp@gmail.com
RNI No. MAHMAR/2012/42770
☎ : -9422072823,251822
epaper.dainikbhukamp.com

किंमत २ रूपये



लातूर - तिरुपती
श्री. बालाजी दर्शनासहित
A/C SLEEPER | AIR SUSPENSION
ऑगस्ट महिन्याचे वेळापत्रक
ऑगस्ट महिन्याच्या तारखा
◂ दर मंगळवारी ▸
1 8 22 29
दुपारी २.०० वा.
अधिक माहितीसाठी संपर्क
88888 50441
88888 45404
विश्व ट्रॅव्हल्स लातूर.





# लातूर उत्स्फूर्त बंद

**लातूर : काल जालना जिल्ह्यातील अंबड तालुक्यातील अंतरवाली येथे मराठा आरक्षण आंदोलकावर झालेल्या लाठीहल्ल्याच्या विरोधात आज लातूर शहरात तीव्र संताप व्यक्त करण्यात आला. हजारोंच्या संख्येने मराठा कार्यकर्त्यांनी मोटारसायकल रॅली काढून या कृतीचा निषेध केला व लातूर उत्स्फूर्तपणे आणि शांततेत बंद केले.**

अंतरवाली येथे मराठा आंदोलकांवर लाठीमार, हवेत गोळीबारची घटना काल घडली. याचा लातूर शहरातील मराठा कार्यकर्त्यांनी तीव्र शब्दात निषेध केला. शहरातून मोटारसायकल रॅली काढून शासनाच्या विरोधात घोषणा दिल्या. रॅलीचा समारोप छत्रपती शिवाजी महाराज चौकात करण्यात आला. या रॅलीचे वैशिष्ट्य म्हणजे रॅलीमध्ये विद्यार्थ्यांची संख्या लक्षणीय होती. बंदच्या पार्श्वभूमीवर शहरातील अनेक हॉटेल, दुकाने, आस्थापने सकाळी उघडलीच नाहीत. लातूर येथील कृषी उत्पन्न बाजार समितीचा सौदा निघाला नाही. आडत बाजार बंद होता तर एस. टी. महामंडळाने लातूर येथून एकही एस. टी. पुढील आदेशापर्यंत बसस्थानकाबाहेर काढायची नाही, असा निर्णय घेतल्याने दुपारपर्यंत तरी एस. टी. पूर्णपणे बंद होती. बंदच्या दरम्यान कोठेही अनुचीत प्रकार घडल्याचे दुपारपर्यंत तरी वृत्त नाही. बंद स्वयंस्फूर्त व शांततेत करण्यात आला.

# जिल्ह्यातील पिकांच्या नुकसानीचे पंचनामे करण्याचे पालकमंत्र्यांकडून आदेश

लातूर : लातूर जिल्ह्यात पावसाचा मोठा खंड पडल्याने जिल्ह्यातील पिकं धोक्यात आली आहेत. जिल्हा प्रशासनाने याबाबत तात्काळ पंचनाम्याची कार्यवाही करावी, असे आदेश पालकमंत्री गिरीश महाजन यांनी जिल्हाधिकारी यांना दिले आहेत.

शेती पिकांच्या नुकसानीचे पंचनामे करण्यासोबतच, पिण्याच्या पाण्याचेही योग्य नियोजन करण्याचे आदेश पालकमंत्री श्री. महाजन यांनी दिले आहेत. या अनुषंगाने शासन स्तरावरून सर्वोतोपरी सहकार्य केले जाईल. पिक विम्यासंदर्भात उचित कारवाई लवकरात लवकर करण्याचे आदेशही यावेळी पालकमंत्र्यांनी दिले. पाऊस लांबला असल्यामुळे टंचाई परिस्थिती निर्माण होऊ शकते, ही बाब लक्षात घेऊन कृषि विभाग, महसूल विभाग व संलग्न सर्व विभागांनी उपाययोजनांचे योग्य नियोजन करावे. यात दिरंगाई होणार नाही, याची खबरदारी घेण्याच्या सूचनाही पालकमंत्री श्री. महाजन यांनी यावेळी दिल्या आहेत.

खरीप हंगाम २०२३ अंतर्गत प्रधानमंत्री पीक विमा योजनेत सहभागी झालेल्या सोयाबीन पीक विमाधारक शेतकऱ्यांना नुकसान भरपाईची २५ टक्के आगाऊ (अग्रिम) रक्कम देण्याची अधिसूचना काढण्यात आली आहे. त्या अनुषंगाने आवश्यक कार्यवाही गतीने करावी, अशी सूचना पालकमंत्री यांच्याकडून देण्यात आली. लातूर शहराला मांजरा धरणातून पिण्याचे पाणी पुरविले जाते. या धरणाची पाणीपातळी २४ टक्केपेक्षाही खाली गेली आहे. या गोष्टीचे गांभीर्य ओळखून पाणी पुरवठा केला जातो आहे. तसेच जिल्ह्यातील सर्व प्रकल्पातील पाणीसाठा राखीव ठेवण्यासंदर्भात जिल्हाधिकारी यांनी आदेश काढले आहेत. पाटबंधारे विभागाच्या यंत्रणांनी याचे काटेकोर पालन करावे, तसेच कोठेही पिण्याच्या पाण्याची टंचाई होणार नाही, यासाठीचे नियोजन करण्याच्या सूचनाही पालकमंत्री श्री. महाजन यांनी यावेळी दिल्या.


लातूर जिल्हा दुष्काळाच्या खाईत
पालकमंत्री जळगाव-मुंबईत
लातूर : लातूर जिल्ह्यात पाण्याचा प्रश्न निर्माण झाला आहे, चारा टंचाईची वेळ आली आहे. पिके वाळून जाण्याने संपूर्ण
दै. भूकंपने १ सप्टेबर २३ च्या अंकात या मथळ्याखाली वृत्त छापले होते.

# शेळ्या-मेंढ्याच्या चारा-पाण्याची सोय करा- मल्हार सेना

संभाजीनगर : राज्यातील अनेक जिल्ह्यामध्ये पशुधनाच्या पाणी आणि चाऱ्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. शेतकऱ्यांच्या पशुधनाच्या चारा आणि पाणी देण्याचा विचार करित असताना शेळ्या-मेंढ्यांना चारा-पाण्याची सोय करावी अशी मागणी मल्हार सेनेच्या वतीने करण्यात आली आहे.

संघटनेचे सरसेनापती लहु शेवाळे, संघटक माधव जाधव यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, महसूलमंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील, ना. अतुल सावे यांच्याकडे केली आहे. राज्यातील छत्रपती संभाजी नगर, नाशिक, बुलडाणा, जळगाव, जालना, लातूर, धाराशिव, अहमदनगर, बीड, परभणी, धुळे जिल्ह्यात अत्यल्प पाऊस झाला आहे. पाऊस नसल्याने कुरणच आलं नाही, पाणी नाही. आपल्याकडील शेळ्या-मेंढ्यांना चारा, पाणी कसे पुरवायचे हा मेंढपाळासमोर मोठा प्रश्न आहे. शासनाने तातडीने शेळ्या-मेंढ्याच्या चारा-पाण्याची सोय करावी, असे निवेदनात म्हटले आहे.

# सिकंदरपूर येथे विमुक्त भटके मुक्तीसंग्राम दिन साजरा

लातूर : देशाला स्वातंत्र्य १५ ऑगस्ट १९४७ ला मिळाले असले तरी विमुक्त भटक्यांना कुंपणाच्या तारेच्या बेडीतून ३१ ऑगस्ट १९५२ रोजी स्वातंत्र्य मिळाले म्हणून परवा सिकंदरपूर, ता. लातूर येथे वडार समाजाच्या वयोवृद्ध महिलेच्या हस्ते राष्ट्रीय ध्वज फडकावून विमुक्त भटके मुक्तीसंग्राम दिनाच्या वर्धापन दिन साजरा करण्यात आला.

१८७१ च्या गुन्हेगारी कायद्यानुसार देशातील वडार, कैकाडी, पाथरवट, पाथरूट, कंजारभाट, कोलाटी, पारधी, बेरड, पामलोर, रामोशी, छप्परबंद, भामटा, टाकनखार, टकारी, भिल्ल आदिवासी समुहाला गुन्हेगार म्हणून ब्रिटिश सत्ताधाऱ्यांनी तारेच्या कुंपणात बंदिस्त करून ठेवले होते. देश स्वतंत्र झाल्यानंतरही हे समाज बांधव कुंपणाच्या बेडीतच होते. ३१ ऑगस्ट १९५२ रोजी पंडीत जवाहरलाल नेहरू यांनी सोलापूर येथे येऊन तारेच्या कुंपणास कात्री लावून विमुक्त भटक्यांना मुक्त केले होते. ३१ ऑगस्ट हा दिवस विमुक्त भटके मुक्तीसंग्राम दिन म्हणून पाळला जातो. सिकंदरपूर येथे श्रीमती शामलबाई गंगाराम ईटकर यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी हरिभाऊ गायकवाड, माधव गंभीरे, रामराजे आत्राम, बाबुराव शेल्लाळे, लक्ष्मण पोटे, प्रमोद गायकवाड, जयसिंग कतारी, भगवान चितोडिया, झाकणे, ईटकर, लष्करे आदींची उपस्थिती होती.

## त्यांच्या मते....

▣ **अजित पवार यांची एवढी दहशत आहे की त्यांना एकही माणूस 'गद्दार' म्हणत नाही.**

- ना. गुलाबराव पाटील

☛ त्यांचेवर 'खोके'चा आरोप कुठे झाला?

▣ **याचिका दाखल करून वकिलावर खर्च करण्यापेक्षा दुकानदारांनी आपल्या दुकानावर 'मराठी'तून पाट्या कराव्यात.**

- सर्वोच्च न्यायालय

☛ हा झाला व्यवहार

▣ **अंतरवालीत जमावाने पोलीस पथकास घेरून त्यांचेवर दगडफेक केली.**

- देवेंद्र फडणवीस

☛ अगोदर लाठीमार कि दगडफेक?

▣ **मराठा समाजाला आरक्षण देणं खरच शक्य आहे का? ते न्यायालयात टिकेल का? मराठा समाजातील मुला-मुलींना देण्यासाठी किती सरकारी नोकऱ्या आहेत?**

-राज ठाकरे

☛ आपण एखाद्या राजकीय पक्षाचे आहोत हे बाजूला ठेऊन राजकीय नेत्यांनी एकूणच 'आरक्षण' प्रश्नावर गांभीर्याने विचार करायलाच हवा.

# उदगिरात घरफोडी; साडेसहा लाखांचा ऐवज लंपास

उदगीर : उदगीर येथील दत्तनगर बीदर गेट परिसरात असलेल्या घराचा कडी-कोंडा व कुलूप तोडून आत प्रवेश करून चोरट्याने सुमारे साडेसहा लाख रूपयांचा ऐवज चोरून नेला आहे.

अभय बाबुराव जाधव यांच्या घराचा कडी-कोंडा तोडून ३१ ऑगस्ट रोजी रात्री चोरट्यांनी घरातील कपाटातील सोन्या-चांदीचे दागिने व रोख असा एकूण ६ लाख ४१ हजार ७०० रूपयांचा ऐवज चोरून नेला आहे. या प्रकरणी अभय जाधव यांच्या फिर्यादीवरून उदगीर ग्रामीण पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस चोरट्यांचा शोध घेत आहेत.

## अनसरवाडा येथून दोन म्हशी, दोन वगार चोरी

निलंगा : मौजे अनसरवाडा, ता. निलंगा येथील शेत शिवारातून गोठ्यासमोर बांधलेल्या दोन म्हशी व दोन वगार दावणीच्या सोडून चोरून नेल्याचा प्रकार घडला असून या प्रकरणी निलंगा पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. धोंडीराम निळकंठ माने रा. अनसरवाडा यांच्या अनसरवाडा शिवारातील सर्व्हे नं. ९९ मधील गोठ्यासमोर बांधलेल्या दोन मुऱ्हा म्हशी किंमत १ लाख रूपये व दोन वगार किंमत ६० हजार रूपये अशा एकूण १ लाख ६० हजार रूपयांच्या म्हशी चोरट्याने चोरून नेल्या आहेत. या घटनेने शेत शिवारात आखाड्यावर बांधण्यात आलेल्या पशुधनाच्या सुरक्षीततेबाबत चिंता वाढली आहे.

## जालन्यात होणारा 'शासन आपल्या दारी' कार्यक्रम पुढे ढकलला

जालना : जालन्यात पोलिसांकडून मराठा आंदोलकांवर काल झालेल्या लाठीमारानंतर मराठा समाज संतप्त झाला आहे. जालन्यासह राज्यभर तणावाचे वातवरण आहे. या पार्श्वभूमीवर ८ सप्टेंबरला जालना येथे होणाऱ्या शासन आपल्या दारी या कार्यक्रमाची तारीख पुढे ढकलली आहे. यापूर्वी दोन वेळा या कार्यक्रमाची तारीख बदलण्यात आली होती. आता मराठा आरक्षणाचे आंदोलन चिघळल्यानंतर तिसऱ्यांदा या कार्यक्रमाची तारीख बदलण्यात आली आहे. आता हा कार्यक्रम १६ सप्टेंबरला जालन्यात पार पडणार असल्याची माहिती मिळत आहे. जालन्यातील अंतरवाली सराटी गावामध्ये मराठा आरक्षणासाठी उपोषण सुरु होतं. मात्र उपोषणकर्ते आणि पोलिसांमध्ये वाद झाला. त्याचं रुपांतर झटापटीत झालं. त्यानंतर तिथं दगडफेक झाली. पुढे आंदोलकांना पांगवण्यासाठी पोलिसांनी त्यांच्यावर लाठीमार केला. हे कमी म्हणून की काय हवेत गोळीबारही केला. पोलिसांच्या या कारवाईविरोधात राज्यभर संताप व्यक्त होतोय. या प्रकरणी १६ आरोपीसह ३०० ते ३५० अज्ञात लोकांवर गुन्हे दाखल करण्यात आलेत. जालन्यातील गोंदी पोलीस ठाण्यात त्यांच्यावर कलम ३०७, ३३३ यांसह सार्वजनिक मालमत्तांचे नुकसान केल्या प्रकरणी गुन्हे दाखल करण्यात आलेत. यातील १६ आरोपींची ओळख पटली आहे. पोलिसांना कट करून जिवे मारण्याचा प्रयत्न करणे, यासह खासगी आणि सार्वजनिक मालमत्तांचे नुकसान केल्याप्रकरणी प्रशासनाकडून आरोपींवर गुन्हे दाखल करण्यात आलेत.

# ट्युशन एरियातील विद्यार्थ्यांना पोक्सो, सायबर क्राईम बाबत मार्गदर्शन



लातूर : लातूरच्या ट्युशन एरियात शिकवणीच्या उद्देशाने हजारो विद्यार्थी, विद्यार्थीनी असतात या एरियात कायदा व सुव्यवस्था रहावी, विद्यार्थ्यांमध्ये सुरक्षीततेची भावना निर्माण व्हावी म्हणून लातूर पोलीस अधीक्षक कार्यालया अंतर्गत असलेल्या भरोसा सेलच्या वतीने पोक्सो सायबर क्राईम, सोशल मीडिया, डायल ११२ विषयी मार्गदर्शन करण्यात आले.

लातूर शैक्षणिक दृष्ट्या अत्यंत प्रसिद्ध व महत्त्वाचे असून लातूर शैक्षणिक पॅटर्न मुळे संपूर्ण महाराष्ट्र व परराज्यातून मोठ्या प्रमाणात विद्यार्थी- विद्यार्थिनी शिक्षणासाठी जिल्ह्यात येत असून शिक्षणासाठी येणाऱ्या विद्यार्थ्यांचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे. बाहेरील जिल्ह्यातून व राज्यातून शिक्षणासाठी येणारे बहुसंख्य विद्यार्थी हे अल्पवयीन असल्याने समाजातील काही घटक त्यांना त्रास देण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे गजबजलेल्या ट्युशन एरियातील कायदा सुव्यवस्था अबाधित राहण्यासाठी,विद्यार्थ्यांमध्ये व त्यांच्या पालकांमध्ये सुरक्षिततेची भावना निर्माण व्हावी तसेच असामाजिक तत्त्वावर कार्यवाही करण्यासाठी पोलीस अधीक्षक श्री. सोमय मुंडे यांनी ट्युशन एरियामध्ये पोलिसांची पायी पेट्रोलिंग, दामिनी पथक, भरोसा सेल मधील महिला पोलीस अधिकारी अंमलदार यांची गस्त , विद्यार्थी, पालक, हॉस्टेल मालक, ट्युशन चालवणारे संचालक यांची वेळोवेळी बैठक घेऊन मार्गदर्शन व समुपदेशन करण्याचे काम मोठ्या प्रमाणात करण्यात येत असून ट्युशन एरियात विनाकारण वाहनावर फिरणाऱ्या लोकांवर कार्यवाही करण्यासंदर्भात आदेशित केले होते.

त्या अनुषंगाने दिनांक ३१ ऑगस्ट रोजी सायबर सेल व दामिनी पथक यांचे वतीने आय आय बी व विद्या आराधना या दोन्ही ट्युशन क्लासेस मध्ये पोक्सो कायदा, सोशल मीडिया, सायबर क्राईम व डायल ११२ यासंबंधी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. सदर मार्गदर्शना करिता सायबर एक्सपर्ट श्री मुकेश भांदरगे, पुणे हे उपस्थित होते. सोशल मीडियाच्या अतिवापराकडे तरुणाईचा वाढता कल पाहता तरुणांना यापासून उद्भवणाऱ्या धोक्यांना प्रतिबंधित करण्यासाठी त्यांना त्यासंबंधी अवेअर करणे गरजेचे आहे. त्याकरिता लातूर जिल्हा पोलीस दलातील भरोसा सेल, सायबर सेल व दामिनी पथक यांच्या वतीने सदर मार्गदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी बोलताना सायबर एक्सपर्ट श्री. मुकेश भांदरगे यांनी विद्यार्थ्यांना सोशल मीडियाचे असणारे धोके कसे टाळावेत. तसेच सायबर क्राईम, ऑनलाइन फ्रॉड यासंबंधी विस्तृतपणे मार्गदर्शन केले. तर भरोसा सेल चे सहाय्यक पोलीस निरीक्षक, दयानंद पाटील यांनी विद्यार्थ्यांना पोक्सो कायदा, डायल ११२, पोलीस सोशल मीडिया मॉनिटरिंग सेल यासंबंधीचे मार्गदर्शन विद्यार्थ्यांना केले.

लातूर शहरांमध्ये ट्युशन परिसरात जवळपास ३० ते ४० हजार विद्यार्थी क्लासेस करिता वास्तव्यास आहेत. अशावेळी टवाळखोर मुले किंवा समाजकंटक यांचे कडून मुला-मुलींना होणारा त्रास टाळण्यासाठी व त्यांना तात्काळ पोलीस मदत कशा पद्धतीने उपलब्ध होईल यासाठी विद्यार्थ्यांना काही हेल्पलाइन संबंधी माहिती देण्यात आली. तसेच हेल्पलाइन नंबर असलेले पोस्टर्स चे विद्यार्थ्यांच्या हस्ते अनावरण करून ते क्लासेस परिसरात लावण्यात आले आहेत.

सदरचा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी आय.आय.बी. क्लासेसचे संचालक श्री. चिराग सर तसेच विद्या आराधना क्लासेसचे संचालक श्री. संजय लड्डा सर यांनी मदत केली.

एकंदरीत ट्युशन एरिया मध्ये शिकवणीसाठी स्थानिक व बाहेरचे विद्यार्थी मोठ्या प्रमाणात येत असल्याने व तेथे सतत वर्दळ असल्याने सदर परिसरात कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी, शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये सुरक्षिततेची भावना निर्माण व्हावी. याकरिता लातूर पोलिसांकडून सदर परिसरात वेळोवेळी अचानकपणे कोंबिंग ऑपरेशनचे आयोजन करून समाजविघातक प्रवृत्तीवर कार्यवाही करण्यात येत आहे.

सदरचा कार्यक्रम दोन्ही क्लासेस मध्ये वेगवेगळ्या ठिकाणी आयोजित करण्यात आला होता. या मार्गदर्शनाचा दोन्ही क्लासेसचे मिळून जवळपास सहा हजार विद्यार्थ्यांनी लाभ घेतला. यावेळी दोन्ही क्लासेसचे शिक्षक, भरोसा सेल व दामिनी पथकातील महिला पोलीस अंमलदार हजर होत्या.

# कोठे सुरू झाली देशातील पहिली कोळसा खाण? नागरी सेवा परीक्षेत विचारला जाऊ शकतो हा प्रश्न

भारतात कोळशाला काळे सोने असेही म्हणतात. सरकारपासून कंत्राटदारांपर्यंत, वाहतूकदारांपासून कमिशन एजंटपर्यंत सर्वजण कोळशाच्या व्यवसायातून चांगला पैसा कमावतात. कोळशाचे बेकायदेशीर उत्खनन थांबवण्यासाठी अलीकडेच कोळसा मंत्रालयाने मायनिंग सेंटिनेल मोबाईल ॲप देखील लाँच केले आहे, परंतु तुम्हाला माहित आहे का की देशात पहिली कोळसा खाण कुठे सुरू झाली होती. सिव्हिल सर्व्हिसेसच्या प्रश्नपत्रिका सेट करणाऱ्या लोकांचा कोळसा हा आवडता विषय आहे, कारण गेल्या काही वर्षांत त्यासंबंधीचे प्रश्न प्री आणि मेनमध्ये विचारले गेले आहेत. त्याच्याशी संबंधित प्रश्नांची उत्तरे जाणून घेऊया.

कोळसा मंत्रालयाने इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्रालयाच्या मदतीने कोळशाचे बेकायदेशीर उत्खनन थांबविण्यासाठी मायनिंग सेंटिनेल मोबाइल ॲप देखील सुरू केले आहे. मंत्रालयाकडे कोळसा खाण निरीक्षण आणि व्यवस्थापन प्रणाली पोर्टल देखील आहे. बेकायदा कोळसा खाणकामाची माहिती सर्वसामान्य नागरिकांनी ॲपद्वारे सरकारला द्यावी, अशी सरकारची इच्छा आहे.

सरकार अशा लोकांची ओळख गुप्त ठेवणार आहे. या ॲपचे सकारात्मक परिणाम सरकारला मिळू लागले आहेत. मोठ्या संख्येने लोक बेकायदेशीर खाणकाम संदर्भात छायाचित्रे आणि ठिकाणे देखील शेअर करत आहेत. याची गरज होती, कारण देशात अवैध कोळसा उत्खननाचा धंदा सातत्याने वाढत आहे आणि त्यामुळे सरकारचेही मोठे नुकसान होत आहे.

भारत हा जगातील प्रमुख कोळसा उत्पादक देशांपैकी एक आहे. जगातील प्रमुख कोळसा उत्पादक देश चीन, अमेरिका, रशिया, भारत, जपान आणि ऑस्ट्रेलिया आहेत.

भारत आपली कोळशाची गरज पूर्ण करू शकत नाही. गेल्या आर्थिक वर्षात कोळशाच्या आयातीत ३० टक्क्यांनी वाढ झाली आहे.

मध्य प्रदेश, तेलंगणा, छत्तीसगड, ओडिशा, झारखंड आणि पश्रि्चम बंगाल ही प्रमुख कोळसा उत्पादक राज्ये आहेत.

भारतात कोळसा खोदण्याची सुरुवात सुमारे २४९ वर्षांपूर्वी झाली. सन १७७४ मध्ये पश्रि्चम बंगालच्या राणीगंज कोळसा क्षेत्रात ईस्ट इंडिया कंपनीने कोळसा खोदण्यास सुरुवात केली.




स्वातंत्र्यानंतर अनेक वर्षे कोळसा खाणी खासगी हातात राहिल्या. सन १९५६ मध्ये प्रथमच राष्ट्रीय कोळसा विकास महामंडळाची स्थापना करण्यात आली.

१९७१ ते १९७३ पर्यंत सरकारने दोन टप्प्यात कोळसा खाणींचे राष्ट्रीयीकरण केले.

कोळसा खाणी (विशेष तरतुदी) कायदा २०१५ द्वारे, सरकारने लिलावाद्वारे कोळसा खाणींचे वाटप करण्यास सुरुवात केली.

२०१८ मध्ये केंद्र सरकारने खासगी कंपन्यांना व्यावसायिकरित्या कोळसा खाण करण्यास परवानगी दिली.

२०२२-२३ मध्ये भारताने १४.७७ टक्के वाढीसह ८९३.१९ दशलक्ष टन कोळशाचे उत्पादन केले.

असे असूनही, गेल्या आर्थिक वर्षात भारताने एकूण २३७.६७ दशलक्ष टन कोळसा आयात केला.

दरवर्षी कोळशाच्या उत्पादनात वाढ होत असली तरी त्याचा वापरही वाढत आहे, परिणामी आयात कमी करता येत नाही.

# घरीच पॉलिश करा तुमची गाडी, वाचतील तुमचे हजारो रुपये

कार पॉलिशिंगसाठी तुम्हाला जास्त पैसे खर्च करण्याची गरज नाही. तुम्ही घरीच कार पॉलिशिंग करू शकता आणि तुमची कार एकदम नवीन दिसू लागेल. कार पॉलिशिंग दोन प्रकारे करता येते, एक हाताने आणि दुसरी कार पॉलिशिंग मशीनने, येथे आम्ही तुम्हाला सांगणार आहोत की तुम्ही तुमची कार घरी कशी पॉलिश करू शकता. यानंतर, तुम्हाला कार पॉलिश करण्यासाठी हजारो रुपये खर्च करावे लागणार नाहीत आणि कार देखील नवीनसारखी दिसेल.

अनेकांच्या घरात पार्किंग नाही. अशा परिस्थितीत ते लोक आपली वाहने बाहेर पार्क करतात आणि त्यांच्या वाहनांना पाऊस, ओरखडे, सूर्यप्रकाश अशा अनेक समस्यांना सामोरे जावे लागते. आता एवढ्या महागाईमुळे गाडीला पुन्हा पुन्हा पॉलिश करता येत नाही, या युक्तीने तुम्ही घरच्या घरी कार चमकवू शकाल.

कार पॉलिशिंगसाठी लागणारे सामान

कार पॉलिशिंगसाठी आवश्यक असलेल्या वस्तूंमध्ये केमिकल गाईज ब्लॅक लाइट सुपर फिनिश कार पॉलिश, स्पंज किंवा कार पॉलिशिंग ॲप्लिकेटर यांचा समावेश आहे.

तुमच्या कारला अशा प्रकारे हाताने करा पॉलिश

सर्व प्रथम आपली कार पूर्णपणे धुवा.

यानंतर, मायक्रोफायबर टॉवेलने कार पुसून घ्या.

कार पॉलिशिंग पॅड घ्या आणि त्यावर थोडे पाणी लावा आणि कार पॉलिश घ्या.

यानंतर ते हळूहळू गाडीवर लावा. (फक्त पॅडसह वापर करा, हात किंवा बोटे वापरू नका)

प्रथम कार वरून स्वच्छ करा, नंतर खाली या आणि कारला हलका दाब देऊन पॉलिशिंग करा.

पॉलिश करताना, नेहमी गोलाकार हालचालीत पॉलिश करा हे लक्षात ठेवा.

आता पॉलिशला किमान १० मिनिटे सुकण्यासाठी सोडा.

हे सर्व केल्यानंतर, एक मायक्रोफायबर टॉवेल घ्या आणि प्रथम कपड्याने पॉलिश हलके घासून घ्या.

टॉवेलच्या वेगवेगळ्या बाजू छतावर, बॉनेटवर, उजव्या आणि डाव्या बाजूला फक्त वापरा.

आता टॉवेलची वेगळी बाजू वापरा आणि उरलेली पॉलिश काढून टाकण्यासाठी थोडे अधिक घासून घ्या. यानंतर, प्रत्येक कोपऱ्याकडे पुन्हा पहा आणि शेवटचा स्पर्श द्या.

ही प्रक्रिया करताना हातमोजे वापरण्याची खात्री करा आणि कोणतीही पॉलिश वापरताना त्याबद्दल चांगले ज्ञान मिळवा.

# स्मरण मराठवाडा मुक्ती संग्राम लढ्याचे

मराठवाडा स्वातंत्र्य होऊन १७ सप्टेंबर रोजी ७५ वर्षे पूर्ण होत आहे. मराठवाडा मुक्ती संग्रामाचे हे अमृत महोत्सवी वर्ष साजरा करण्यात येत आहे.. त्यानिमित्ताने मराठवाडा काय होता.. इथे निजामशाही कशी आली.. त्या निजामशाहीच्या काळात काय परिस्थिती होती. त्या हुकूमशाही विरोधात जो लढा उभा राहिला तो कसा उभा राहिला आणि अखेर १७ सप्टेंबर १९४८ रोजी हा भाग निजामशाहीच्या जोखडातून मुक्त झाला ते आपण.. आज पासून रोज सतरा सप्टेंबर पर्यंत जाणून घेऊ या....!!

**मराठवाडा हे नाव कसे पडले**

सम्राट अशोकाच्या १६ महाजनपदा पैकी दोन महाजनपदे एक अश्मक आणि दुसरे मूलक हे गोदावरीच्या खोऱ्यात नांदणारी.. हे दोन्ही महाजनपदात बहुतांश लोकं महाराष्ट्री प्राकृत बोलणारी.. सातवाहन राजा हाल यांनी ७०० गाथा एकत्र करून संपादित केलेला गायासप्तशती म्हणजेच गाथा सप्तशती ही प्राकृत मधून असलेली निर्मिती... यात या गोदावरी खोऱ्यातील लोकांचे लोक जीवन प्रतिबिंबीत झाले आहे. यातून एकच ध्वनीत होते की हा प्रदेश म्हणजे मराठीचे आद्य रूप महाराष्ट्री प्राकृत बोलणारा प्रदेश... पुढे अनेकांनी या प्रदेशावर आपली हुकूमत गाजवली आणि १७२४ मध्ये दिल्लीची सुभेदार निजाम उल मुल्क या निजामशहाने हैद्राबाद मध्ये निजामशाही स्थापन केली. यात तीन भाषा बोलणारे प्रदेश होते.. एक तेलगू (आंध्र), कन्नड (कर्नाटक) आणि मराठी (मराठवाडा).. यात लातूर म्हणजे पूर्वाश्रमिचा उस्मानाबाद जिल्हा मराठी बोलणाऱ्या लोकांचा शेवटचा भाग.. म्हणजे निजामाच्या काळात भाषे प्रमाणे प्रदेशाची नावे झाली आणि मराठी बोलणाऱ्या लोकांचा मराठवाडा हे नाव कायम झाले.

**निजाम आणि मराठ्यांच्या चकमकी**

अहमदनगरच्या निजामाच्या पाडावानंतर दक्षिणेत आदिलशाही आणि कुतुबशाही या दोन सम्राज्यांनी मुघलांचे मांडलिकत्व पत्करले. ३ मार्च १७०७ औरंगजेबचा मृत्यू झाला आणि १२ जानेवारी १७०८ साली साताऱ्याच्या अजिंक्यतारा किल्ल्यावर मराठेशाहीचा पुन्हा झेंडा फडकला आणि छत्रपती शाहू महाराज गादीवर आले. मराठ्यांचा राज्य विस्तार झपाट्याने झाला. धनाजी जाधव, नेमाजी शिंदे, दादो मल्हार, संभाजी निंबाळकर हे सरदार मराठ्यांच्या मोहिमेचे नेतृत्व करत होते. औरंगजेबाच्या मृत्यूनंतर मुघलशाही कुमकुवत

**मराठवाडा मुक्ती गाथा (भाग-१)**

झाली. या दोन्ही शाह्या त्यांच्या मुघलांच्या मांडलिकत्वाखाली होत्या. वेळोवेळी निजाम आणि मराठयात तह होत गेले.. अनेक सुभ्यात मोठा महसूली हिस्सा मराठ्यांना मिळत होता. २७ डिसेंबर १७३२ रोजी छत्रपती शाहू महाराजांच्या साम्राज्याचे पेशवे बाजीराव व चिम्माजी आप्पा आणि निजाम यांची लातूर पासून आठ मैलावर मांजरा नदीच्या काठी असलेल्या रुई - रामेश्वर येथे ऐतिहासिक भेट झाली.

(संदर्भ :-अर्ली हिस्ट्री ऑफ डेक्कन,- यझदानी, मोघलकालीन मराठवाडा,- ल. गो. काळे, छत्रपती शिवाजी महाराज - ग. ह. खरे )

**क्रमशः**

**जिल्हा माहिती अधिकारी उस्मानाबाद**

# या भारतीयाने हलवून टाकली अमेरिकेतील यंत्रणा, १ अब्ज रुपयांचा फ्रॉड करून केली ७००० लोकांची फसवणूक

अमेरिकेतील एका घोटाळ्याने सर्वांनाच हादरवले आहे. तांत्रिक समर्थन घोटाळ्यामुळे ७ हजारांहून अधिक लोकांचे १३ दशलक्ष डॉलर्सचे नुकसान झाले आहे. या मेगा घोटाळ्याच्या आरोपाखाली भारतीय वंशाचा नागरिक मनोज यादव याला न्यू जर्सी येथून अटक करण्यात आली आहे. मनोज यादववर ऑनलाइन फसवणुकीचा आरोप असून त्याला गुरुवारीच कोर्टात हजर करण्यात आले.

मनोज यादव एका सॉफ्टवेअर कंपनीत काम करायचा, त्याच्यावर त्याच्या साथीदारांसह कंपनीच्या ग्राहकांची फसवणूक केल्याचा आरोप आहे. या सर्वांनी सॉफ्टवेअर कंपनीच्या नावावर लोकांकडून मोठ्या प्रमाणात पैसे उकळल्याचा आरोप आहे, हे सर्व लोक कंपनी मोफत देत असलेल्या सेवेतून पैसे घेत असत. एफबीआयने मनोज यादव याच्यावर हा मुख्य आरोप केला आहे.

अमेरिकेतील कायद्यानुसार अशा प्रकरणांमध्ये आरोपीला २० वर्षांपर्यंत कारावास आणि २.५ लाख डॉलर्सचा दंड ठोठावण्याची तरतूद आहे. एफबीआयने या प्रकरणी म्हटले आहे की, अलीकडच्या काळात अमेरिकेत अशी प्रकरणे वाढली आहेत, आजकाल फसवणूक करणाऱ्यांची संख्या वाढत आहे आणि फसवणूक करणारे लोक तंत्रज्ञानाचा फायदा घेत लोकांना अडकवत आहेत.

२०१७ ते २०२३ पर्यंत हा घोटाळा सुरू होता, मनोज यादव आणि त्याचे अनेक सहकारी भारतातून हे सर्वकाही चालवत होते. हे सर्वजण अमेरिकन सॉफ्टवेअर कंपनीचे कर्मचारी असल्याचा दावा करत होते आणि कंपनी या सुविधा मोफत देत असताना त्यांनी सॉफ्टवेअरमध्ये सुधारणा करण्यासाठी आणि दोष दूर करण्यासाठी त्यांच्या क्लायंटकडून पैसे घेतले होते.

या सॉफ्टवेअर कंपनीने आम्ही कोणत्याही सेवेसाठी पैसे घेत नाही, असे विधानही केले आहे, तर मनोज यादव किंवा अन्य कुणालाही आम्ही अधिकार दिले नव्हते. या घोटाळ्यात स्वतः मनोज यादव यांचा वैयक्तिक सहभाग असल्याचा आरोप होता.

# राज्यात पुन्हा लोडशेडिंग

मुंबई : यंदाच्या कमी पाऊसमानाचा गंभीर फटका राज्याला बसण्याची चिन्हे आहेत. पावसामुळे वीज निर्मितीचा वेग मंदावला आहे. यामुळे विजेची निर्मिती व पुरवठा यात मोठी तफावत निर्माण झाली आहे. परिणामी राज्यावर आपत्कालीन लोडशेडिंग म्हणजे भारनियमन करण्याची वेळ आली आहे. राज्यातील नागरिकांना आता दररोज अर्धा ते २ तासांच्या भारनियमनाला सामोरे जावे लागेल.

यंदा राज्यात कमी पाऊसमान झाले आहे. त्यामुळे विजेच्या मागणीत मोठी वाढ झाली आहे. ही मागणी पूर्ण करण्यात महावितरणला अपयश येत आहे. त्यामुळे राज्यातील काही ठिकाणी अर्धा ते २ तासापर्यंतचे भारनियमन सुरू करण्यात आले आहे. कमी पाऊसमानामुळे शेतकऱ्यांकडून सिंचनासाठी होणारा पाण्याचा उपसा वाढला आहे. परिणामी विजेची मागणी वाढून तुटवडा निर्माण झाला आहे. त्यामुळे राज्यात आपत्कालीन लोडशेडिंग करण्यात येत आहे, अशी माहिती महावितरणच्या एका अधिकाऱ्याने दिली. राज्यात काही भागात अर्धा तास ते २ तासांपर्यंत लोडशेडिंग केली जात आहे. विजेची वाढीव मागणी कमी झाली किंवा पाऊस झाला, तर लोडशेडिंग आपसूकच बंद होईल, असे या अधिकाऱ्याने सांगितले.

सद्यस्थितीत विजेची कमाल मागणी २६ हजार मेगावॅटपेक्षा जास्त वाढली आहे. सामान्यतः ऑगस्ट महिन्यात होणाऱ्या पावसामुळे कृषी क्षेत्रातील विजेची मागणी कमी होते. पण यंदा ही मागणी कमी झाली नाही. उलट



वाढत्या उकाड्यामुळे एसी, कुलर अजून सुरू आहेत. त्यामुळे विजेची मागणी वाढली आहे, असे महावितरणाच्या अधिकाऱ्यांनी सांगितले.

दुसरीकडे महाजेनकोने कमी पावसामुळे औष्णिक वीज केंद्रातील अनेक युनिट देखभालीसाठी बंद ठेवली आहेत. यामुळे विजेची मागणी व पुरवठ्यात तब्बल २ ते ३ हजार मेगावॅटचा तुटवडा निर्माण झाला आहे. महावितरणने या समस्येचा निपटारा करण्यासाठी काही फिडरवर अचानक लोडशेडिंग सुरू केले.

# जागतिक नारळ दिन

दरवर्षी २ सप्टेंबर रोजी जागतिक नारळ दिन साजरा केला जातो. नारळाची बहुमुखी उपयुक्तता आणि त्याची मागणी लक्षात घेऊन २ सप्टेंबर १९६९ रोजी एशियन आणि पॅसिफिक कोकोनट कम्युनिटी (APCC) सुरू झाली. जकार्ता, इंडोनेशियात या दिवशी -झउउ ची स्थापनादेखील झाली. तेव्हापासून, जागतिक नारळ दिवस जगभरात सातत्याने साजरा केला जात आहे.

प्रामुख्याने हा दिवस आशियाई आणि पॅसिफिक प्रदेशांमध्ये साजरा केला जातो. कारण या प्रदेशांमध्ये जगातील सर्वात जास्त नारळ उत्पादन केंद्रे आहेत. दरवर्षी शेतकरी, तज्ज्ञ आणि व्यवसाय मालक मोठ्या उत्साहाने हा दिवस साजरा करतात. आंतरराष्ट्रीय पातळीवर नारळाविषयी जागरूकता वाढवणे हे या दिवसाचे मुख्य उद्दिष्ट आहे.

आपल्या देशात नारळाचे आध्यात्मिक आणि औषधी मूल्य आहे. नारळाच्या प्रत्येक भागाला खूप महत्त्व आहे. हे उशिरा पचवणारा, मूत्राशय साफ करणारा, ग्रहण करणारा, पौष्टिक, शक्तिशाली, रक्तविरोधी, जंतुनाशक, जंतुनाशक आणि वात-पित्त नष्ट करणारा आहे. त्याच्या थंड प्रभावामुळे, त्याचे पाणी सर्व शारीरिक समस्यांपासून आराम देते. नारळाची सार्वत्रिक उपयोगिता पाहता, जागतिक नारळ दिन साजरा करणे हे त्याचे उत्पादन, महत्त्व आणि सर्वसामान्यांसाठी सुलभ बनवण्याच्या उद्देशाने आणि त्याबद्दल जागरूकता वाढविण्याच्या उद्देशाने सुरू करण्यात आले आहे.

जेणेकरून नारळाचा कच्चा माल निर्यात करून जगभर उत्पादन केले जाऊ शकते. नारळ लागवड आणि उद्योगातून चांगला रोजगार मिळू शकतो. नारळाचा प्रत्येक भाग अतिशय उपयुक्त आणि फायदेशीर आहे. आपल्या शरीराला आवश्यक असलेले सर्व घटक नारळाच्या पाण्यात मुबलक प्रमाणात उपलब्ध असतात.

# प्रधानमंत्री पिक विमा योजना शेतकऱ्यांना मिळणार नुकसानीच्या २५ टक्के अग्रीम

उस्मानाबाद : सध्याच्या पावसाच्या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी डॉ.सचिन ओंम्बासे यांनी प्रधानमंत्री पिक विमा योजना खरीप हंगाम २०२३ अंतर्गत हंगामातील प्रतिकूल परिस्थितीमुळे नुकसान निश्चित करण्याबाबत अधिसूचना प्रसिद्ध केली.

जिल्ह्यातील एकूण ५७ महसूल मंडळापैकी ३६ महसूल मंडळामध्ये ही अधिसूचना आज प्रसिद्ध करण्यात आली आहे.त्यासाठी वेगवेगळे निकष आहेत.त्यामधील २१ दिवसाच्या पावसाच्या खंडाच्या निकषानुसार उस्मानाबाद,तुळजापूर,उमरगा, लोहारा,कळंब आणि परंडा तालुक्यातील एकूण ३६ मंडळाची अधिसूचना आज प्रसिद्ध करण्यात आली.यामध्ये २१ ऑगस्ट रोजी जिल्हास्तरीय संयुक्त समितीच्या बैठकीमध्ये जिल्हाधिकारी यांनी दिलेल्या निर्देशानुसार जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी यांनी तालुका कृषी अधिकारी,शेतकरी आणि पिक विमा कंपनीचे प्रतिनिधी यांच्यामार्फत पाच टक्के क्षेत्राचे सर्वेक्षण करून अहवाल सादर केला आहे.

या नियमानुसार मागील सात वर्षाच्या सरासरीच्या नजर अंदाजे ५० टक्क्यांपेक्षा जास्त नुकसान होणार असेल तर ही अधिसूचना लागू होते. त्यानुसार २१ दिवसाचा खंड असलेल्या सर्वच ३६ मंडळामध्ये ५० टक्क्यांपेक्षा जास्त नुकसान होत असल्याचा कृषी विभागाच्या अहवालात नमूद आहे. या अधिसूचनेनुसार पुढील महिन्याभरात पिक विमा कंपनीला उंबरठा उत्पन्नाच्या आधारे येणाऱ्या नुकसानीच्या २५ टक्के अग्रीम देण्याच्या सूचना करण्यात आल्या आहेत.

या व्यतिरिक्त ज्या महसूल मंडळामध्ये २१ दिवसाचा पावसाचा खंड मध्येच फक्त २.५ मिमी पावसामुळे खंडित झाला आहे, अशाही २१ मंडळाची माहिती कृषी विभागाने राज्य शासनाला सादर केली आहे.त्याच्यामध्येही ५० टक्केपेक्षा जास्त नुकसान झाले असल्याचे आढळून आले असल्याची माहिती कृषी विभागाने शासनाला दिली आहे. आज त्यासंदर्भात जिल्हाधिकारी यांनी शासनाला पत्र लिहून सध्याच्या पीक परिस्थितीबाबत कळविले आहे.

सध्या ऑगस्ट महिन्यामध्ये १५४.४ मी. मी. सरासरीच्या तुलनेत फक्त २६.९ मी. मी. (१७%) पाऊस झाल्याने मोठ्या प्रमाणात पिकांचे नुकसान झाले आहे.जिल्ह्यातील सोयाबीन या मुख्य पिकाला सर्वात मोठा फटका बसला आहे.पावसाच्या दिवसाच्या व्याख्येच्या २.५ मी.मी. या नियमानुसार शेतकऱ्यांचे नुकसान होऊ नये.या उद्देशाने जिल्हाधिकारी आणि कृषी विभागाने यांच्या स्वाक्षरीने तसा अहवाल शासनास सादर केला आहे.

# सर्व बस चालकांनी नेत्र व आरोग्य तपासणीचा लाभ घ्यावा

## - सहायक परिवहन अधिकारी राहुल जाधव

उस्मानाबाद : महाराष्ट्र राज्य परिवहन विभागाच्या अंतर्गत कार्यरत असलेल्या बस चालकांकडून विविध कारणांमुळे अपघाताचे प्रमाण वाढत असल्याच्या अनेक घटना समोर येत आहेत. त्यामध्ये नेत्रदोष व इतर शारीरिक आजारामुळे देखील असे अपघात होण्याचे प्रमाण वाढले आहे. ते रोखण्यासाठी बस चालकांची मोफत नेत्र व शारीरिक तपासणी करण्यात येत असून याचा लाभ सर्व बस चालकांनी घ्यावा असे आवाहन राज्य उपप्रादेशिक परिवहन विभागाचे सहाय्यक परिवहन अधिकारी राहुल जाधव यांनी केले.



रस्त्यावर वाहतुकीमुळे होणारे अपघात रोखण्यासाठी राज्य परिवहन महामंडळ अंतर्गत कार्यरत असलेल्या बस चालकांची उपप्रादेशिक परिवहन कार्यालय, जिल्हा शल्य कार्यालय व जिल्हा शल्य चिकित्सक यांच्या संयुक्त विद्यमाने मोफत नेत्र व शारीरिक आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी राज्य परिवहन महामंडळाचे विभागीय वाहतूक अधिकारी हर्षद बनसोडे, विभाग नियंत्रक चेतना शिरवाडकर, आगार प्रमुख संतोष कोष्टी, मोटार व निरीक्षक दत्तात्रेय पांडकर, श्रीकांत शिंदे, प्रियदर्शनी उपाशी, त्रिवेणी जार्लींदे, सहाय्यक मोटार व निरीक्षक अजित पवार, कुलदीप पवार, तोडकरी आदी उपस्थित होते. पुढे बोलताना जाधव म्हणाले की, बस चालकांना दैनंदिन कामकाजामुळे नेत्र व शारीरिक आरोग्य तपासणी करण्यास वेळ मिळत नाही. त्यामुळे ते आपल्या आरोग्याची तपासणी करून घेऊ शकत नाहीत. तर केंद्र शासनाच्या निर्देशानुसार नेत्र व शारीरिक आरोग्य तपासणी करण्यात आली असून धाराशिव आगारात कार्यरत असलेल्या बस चालकांची तपासणी करण्यात आली. तसेच या शिबिरामध्ये बस चालकांसाठी मोफत नेत्र तपासणी करून ज्या चालकांना चष्मा लागल्याचे निष्पन्न झाले. त्यांना उपप्रादेशिक परिवहन कार्यालयामार्फत मोफत चष्मा देण्यात येणार असून इतर काही आजार निष्पन्न झाल्यास त्यांना जिल्हा सामान्य रुग्णालयात पुढील उपचारासाठी दाखल करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच नोंदणीकृत बसची संख्या कमी असून बाहेरील जिल्ह्यातील वाहतूक मोठ्या प्रमाणात असल्यामुळे ती वाहने तपासून त्यांच्यावर कारवाई करण्यात येत असल्याचे त्यांनी नमूद केले. हे आरोग्य तपासणी शिबिर दि.१ ते ३ सप्टेंबर या कालावधीमध्ये उस्मानाबाद शहरातील मध्यवर्ती बस स्थानकात सुरु राहणार आहे. त्यामुळे जिल्ह्यातील खाजगी बसेसचे चालक, ट्रक चालक व एस टी बस चालक यांच्यासाठी मोफत असणार आहे. तसेच प्रत्येक तालुक्यात देखील पुढील कालावधीमध्ये शिबिराचे आयोजन करण्यात येणार असल्याची त्यांनी सांगितले. या शिबिराच्या यशस्वितेसाठी कार्यालयीन कर्मचारी बालाजी वाघमारे नरसिंह कुलकर्णी आदींसह इतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# जिल्ह्यात तात्काळ दुष्काळ जाहीर करुन चारा छावण्या सुरू करा, अन्यथा तीव्र आंदोलन

धाराशिव : धाराशिव जिल्ह्यात अवर्षणामुळे शेतकर्यांना सरसकट आर्थिक मदत देऊन चारा छावण्या सुरू कराव्यात अन्यथा पशुधनासह जिल्हाधिकारी कार्यालयात बसून आंदोलन करण्याचा इशारा स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष रवींद्र इंगळे यांनी मुख्यमंत्र्यांना दिला आहे.

जिल्हाधिकार्यांमार्फत शुक्रवारी मुख्यमंत्र्यांना निवेदन पाठविण्यात आले. या निवेदनात म्हटले आहे की, धाराशिव जिल्ह्यात महिनाभरापासून पावसाने दडी मारली आहे. त्यामुळे खरीप हंगामातील पिकावर नांगर फिरविण्याची वेळ शेतकर्यांवर आली आहे. जून महिन्याच्या सुरुवातीलाच पाऊस लांबल्यामुळे खरीप हंगामातील पेरण्या खोळंबल्या होत्या. शेतकर्यांनी अपुर्या पावसावर सोयाबीन, मूग, उडीद व इतर पिकांची पेरणी केली तरी ऑगस्ट महिना संपूर्ण कोरडा गेल्याने पिके माना टाकत आहेत. त्यामुळे शेतकर्यांनी पेरणी, खते, बियाणे व कीटकनाशक फवारणी आणि मजुरी यावर खर्च मातीत गेला आहे. आता दुबारपेरणीची वेळही टळून गेल्यामुळे शेतकरी दुहेरी संकटात सापडला आहे.

तर पावसाअभावी चार्याचा प्रश्न निर्माण झाल्याने पशुधन संकटात सापडले आहे. आता पंचनाम्याचा फार्स न करता शेतकर्यांना या संकटातून सावरण्यासाठी आर्थिक मदत तातडीने मदत देण्याची गरज आहे. म्हणून सरकारने तातडीने निर्णय घ्यावा अन्यथा शेतकरी, पशुधनासह जिल्हाधिकारी कार्यालयात बसून आंदोलन करतील. त्यामुळे निर्माण होणार्या परिस्थितीस सर्वस्वी प्रशासन जबाबदार राहील, याची नोंद घ्यावी, असा इशारा स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष रवींद्र इंगळे यांनी निवेदनाद्वारे दिला आहे.

सरकारचे निकष बाजूला ठेवून शेतकर्यांना खरीप हंगामातील नुकसानीपोटी एकरी ५० हजार रुपये मदत द्यावी, पीकविम्याची २५ टक्के अग्रीम रक्कम तातडीने मंजूर करुन शेतकर्यांच्या बँक खात्यांमध्ये जमा करावी, पशुधन जगविण्यासाठी जिल्ह्यात चारा छावण्या सुरू करण्यात याव्यात, पशुपालक शेतकर्यांच्या दुधाला दरवाढ देण्यात यावी, शेतकर्यांची संपूर्ण कर्जमुक्ती करावी, अशा मागण्या निवेदनात करण्यात आल्या आहेत. निवेदनावर शेतकरी संघटनेचे जिल्हा उपाध्यक्ष धनाजी पेंदे, जिल्हा संपर्कप्रमुख शहाजी सोमवंशी, तुळजापूर तालुकाध्यक्ष दुर्वास भोजने, स्वाभिमानी शेतकरी पक्षाचे तुळजापूर तालुकाध्यक्ष नेताजी जमदाडे, विजय सिरसट यांची स्वाक्षरी आहे.

हे पत्र, मुद्रक निखील जयप्रकाश माने यांनी मालक, प्रकाशक, संपादक अशोक व्यंकटराव चिंचोले यांचे करिता चेतन ऑफसेट प्रिंटर्स, १७ शिवाजी हौसिंग सोसायटी, पद्मानगर बार्शी रोड, लातूर येथे मुद्रित केले. हे पत्रक प्रकाशक अशोक व्यंकटराव चिंचोले यांनी दै. भूकंप कार्यालय, मनपा शॉपींग कॉम्पलेक्स गांधी चौक, लातूर, ता.जि. लातूर ४१३५१२(महा.) येथे प्रकाशीत केले. संपादक- अशोक व्यंकटराव चिंचोले ((:-२५१८२२) RNI NO. MAHMAR/2012/42770




# कपाशीच्या पाते, फुल आणि बोंड लागण्याच्या कालावधीमध्ये अशी घ्या काळजी, होईल फायदा



सध्या महाराष्ट्र मध्ये पावसाने खंड दिलेला आहे. त्यामुळे कपाशी सोबतच इतर पिकांना देखील पाण्याची दुर्भिक्ष जाणवत आहे. त्यामुळे खरीप पिकांच्या उत्पादनाला याचा फटका बसण्याची शक्यता आहे. परंतु अशाही परिस्थितीमध्ये जर आपण कापूस या पिकाचा विचार केला तर हा कालावधी कापूस पिकासाठी खूप महत्त्वाचा असून व्यवस्थापनाच्या दृष्टिकोनातून देखील या कालावधीचे महत्त्व खूप अनन्यसाधारण असे आहे.

साधारणपणे हा कालावधी कापूस पिकाला पाते, बोंड लागण्याचा कालावधी असून यावरच कपाशीचे पुढील उत्पादन अवलंबून असते. त्यामुळे हवामानातील बदल किंवा एखाद्या वेळेस जास्त पाऊस पडून गेल्यानंतर उद्भवणारी स्थिति किंवा पाण्याचा ताण पडल्यानंतर कापूस पिकावरील पाते आणि बोंडगळीची समस्या निर्माण होते. ही समस्या जर जास्त प्रमाणात उद्भवली तर नक्कीच उत्पादनावर त्याचा विपरीत परिणाम होतो. या अनुषंगाने आपण या लेखांमध्ये या कालावधीमध्ये कापूस पिकाची काळजी कशी घ्यावी याबद्दल थोडक्यात माहिती घेणार आहोत.

१- यामध्ये सगळयात महत्त्वाचे म्हणजे जेव्हा कपाशीला अगदी सुरुवातीच्या काळामध्ये जे फुल येतात त्यांचे रूपांतर पाते आणि बोंडामध्ये होत असते. परंतु गेल्या काही वर्षापासून आपण बघत आहोत की याच कालावधीमध्ये नेमके पाने लाल पडण्याची विकृती म्हणजेच आपण त्याला लाल्या रोग म्हणतो याचा अटॅक कपाशीवर होताना दिसून येतो.

याच्या नियंत्रणाकरिता आपल्याला मुख्य अन्नद्रव्य देणे गरजेचे आहेच परंतु त्यासोबतच इतर सूक्ष्म अन्नद्रव्यांची फवारणी देखील आवश्यक आहे. कपाशीवर लाल्या रोग येऊ नये याकरिता मॅग्नेशियम सल्फेट एक टक्के म्हणजेच दहा ग्रॅम आणि त्यासोबत युरिया एक टक्के म्हणजेच दहा ग्रॅम प्रति लिटर पाणी याप्रमाणे फवारणी करावी. ही फवारणी करताना कुठल्याही प्रकारचा कीडनाशकाचा यामध्ये समावेश करू नये.

२- दुसरे महत्त्वाचे म्हणजे पीक जेव्हा फुलोरा अवस्थेमध्ये असते तेव्हा दोन टक्के युरिया किंवा दोन टक्के डीएपी म्हणजेच वीस ग्रॅम प्रति लिटर पाणी किंवा १९:१९:१९ पाच ग्रॅम प्रति लिटर पाणी प्रमाणे या अन्नद्रव्यांचे लागवडीच्या ४५ व ६५ व्या दिवशी फवारणी करावी. तसेच फुलोरा अवस्थेमध्ये पीक असेल तर ००:५२:३४ चार ग्रॅम प्रति लिटर पाणी याप्रमाणे फवारणी करावी.

३- फुलोरा अवस्थे नंतर पाते व बोंडे तयार होतात व ही अवस्था खूप महत्त्वाची असते. या कालावधीमध्ये पोटॅशियम नायट्रेट एक टक्का म्हणजेच दहा ग्रॅम प्रति लिटर पाणी घेऊन फवारणी करावी.

४- अनेक नैसर्गिक कारणांमुळे किंवा इतर कारणांमुळे देखील कपाशीची पाते, बोंडांची मोठ्या प्रमाणावर गळ होते. हे टाळण्याकरिता नॅपथील ॲसिटिक ॲसिड म्हणजेच एनएए तीन ते चार मिली प्रति दहा लिटर पाणी या प्रमाणामध्ये पहिली फवारणी करावी व त्यानंतर पंधरा ते वीस दिवस झाल्यानंतर दुसरी फवारणी घ्यावी.

५- बऱ्याचदा आपल्याला कपाशीची कायिक वाढ खूप मोठ्या प्रमाणावर झाल्याचे दिसून येते. अशा परिस्थितीमध्ये कपाशीला बोंडांची संख्या खूप कमी प्रमाणात लागते. त्यामुळे यावर उपाय म्हणून क्लोरमेकॉट क्लोराईड (५०% एसएल) या वाढनियंत्रकाची दहा मिली प्रति दहा लिटर पाणी याप्रमाणे फवारणी करून घ्यावी.

६- कपाशीचे जे काही बोंड असतात त्यांची वाढ पूर्ण झाल्यानंतर बाहेरच्या बाजूने बोंडे सडायला लागण्याचे प्रमाण दिसून येते. हा प्रादुर्भाव टाळण्याकरता प्रोपीकोनॅझोल( २५ टक्के ई.सी.) एक मिली किंवा प्रोपीनेब( ७० डब्ल्यू पी) अडीच ते तीन ग्रॅम प्रति लिटर पाणी या प्रमाणात फवारणी करावी.



# या दोन प्रकारच्या फुलकोबीची वर्षभर लागवड करा, लाखोंची कमाई होईल

आपल्या देशात बहुतांश शेतकरी फक्त भाजीपालाच पिकवतात, अशा अनेक भाज्या आहेत ज्यांची लागवड मोठ्या प्रमाणावर केली जाते. यापैकी फुलकोबी हेही महत्त्वाचे पीक आहे. फुलकोबी हे सर्वसाधारणपणे हिवाळयाच्या हंगामात घेतले जाते, परंतु आजकाल अनेक सुधारित जाती आहेत ज्या इतर हंगामात देखील घेतल्या जाऊ शकतात, त्यापैकी फुलकोबी पीक देखील असेच एक पीक आहे.

फुलकोबी हे क्षेत्र आणि उत्पादनाच्या दृष्टीने पंजाबमधील तिसरे महत्त्वाचे पीक आहे. फुलकोबी हे मुळात हिवाळ्यातील पीक आहे, परंतु योग्य जातीच्या निवडीसह ते जवळजवळ वर्षभर घेतले जाऊ शकते. शेंगा तयार झाल्यावर तापमान २३ओउ आणि फुले तयार झाल्यावर १७-२०ओउ असावे. हे सर्व प्रकारच्या जमिनीत घेतले जाऊ शकते, परंतु त्याची लागवड वालुकामय ते वालुकामय चिकणमाती जमिनीत सर्वोत्तम आहे.

हंगामानुसार कोबीची योग्य विविधता निवडणे फार महत्वाचे आहे जेणेकरून पीक लहान नाही आणि फुले लहान नाहीत. पंजाब कृषी विद्यापीठाने पुसा स्नोबॉल-१ आणि पुसा स्नोबॉल के-१ (पुसा स्नोबॉल के-१) या कोबीच्या दोन जातींची शिफारस केली आहे.

सुरुवातीच्या हंगामातील पिकासाठी जून ते जुलै, मुख्य हंगामातील पिकासाठी ऑगस्ट ते मध्य सप्टेंबर आणि उशिरा हंगामातील पिकासाठी ऑक्टोबर ते नोव्हेंबरचा पहिला आठवडा हा भात उपटण्यासाठी आणि लावणीसाठी सर्वोत्तम काळ मानला जातो. फुलकोबीची एक एकर लागवड करण्यासाठी लवकर पिकासाठी ५०० ग्रॅम बियाणे आणि उशिरा आणि मुख्य जातींसाठी २५० ग्रॅम बियाणे पुरेसे आहे. लवकर आणि उशीरा पिकांसाठी, रेषा आणि रोपांमधील अंतर ४५ु ३० सेमी ठेवावे आणि मुख्य पिकासाठी, रेषा आणि रोपांमधील अंतर ४५ु ४५ सेमी ठेवावे.

**फुलकोबीसाठी खत**

म्हणून, प्रति एकर ४० टन कुजलेले खत आणि ५० किलो नायट्रोजन (११० किलो युरिया), २५ किलो स्फुरद (१५५ किलो सुपरफॉस्फेट) आणि २५ किलो पोटॅश (४० किलो म्युरिएट ऑफ पोटॅश) टाकणे आवश्यक आहे. पनीरीची पेरणी करण्यापूर्वी शेणखत, पूर्ण स्फुरद, पूर्ण पालाश आणि अर्धे नायट्रोजन खत शेतात टाकावे. नत्र खताची उर्वरित अर्धी मात्रा लागवडीनंतर चार आठवड्यांनी द्यावी.



# लाल भेंडी शेतकऱ्यांना फायदेशीर, जाणून घ्या कशी केली जाते लागवड

तुम्ही हिरवी भेंडीची भाजी अनेकदा खाल्ली असेल, पण तुम्ही कधी लाल भेंडीची भाजी खाल्ली आहे का? लाल भेंडी ही अशी भाजी आहे जिची उन्हाळ्यात मागणी जास्त असते. यामुळेच भारतीय शेतकरी आजकाल रेड लेडीफिंगरपासून भरपूर नफा कमावत आहेत. तुम्हीही शेतकरी असाल आणि भाजीपाला लागवड करत असाल तर यावेळी इतर भाजीपाला ऐवजी लाल भेंडीची लागवड करा.

हे पीक तयार झाल्यावर तुम्हाला मोठा नफा मिळेल.लाल भिंडीची सर्वात चांगली गोष्ट म्हणजे तिची मागणी देशापेक्षा परदेशात जास्त आहे. परदेशातही त्याची भरपूर लागवड होते. परदेशातील लोक ग्रीन लेडी फिंगरऐवजी रेड लेडी फिंगर खाणे पसंत करतात. वास्तविक, यामागचे कारण म्हणजे हिरव्या भेंडीपेक्षा लाल भेंडीमध्ये जास्त पौष्टिक घटक आढळतात.

लाल भेंडीमध्ये अनेक प्रकारचे पौष्टिक घटक असतात, ज्याला लाल भेंडी असेही म्हणतात. यामध्ये अँटीऑक्सिडंट्स आणि आयर्न मुबलक प्रमाणात आढळतात. ही लाल बोट साखरेच्या रुग्णांसाठी रामबाण उपाय असल्याचे सांगितले जाते. या पौष्टिक घटकांमुळे लोकांमध्ये या रेड लेडी फिंगरची मागणी खूप वाढली आहे. याचे फायदे पाहून आता आहार तज्ञ लोकांना लाल भेंडी खाण्याचा सल्ला देत आहेत.

मात्र, तुम्हाला कोणत्याही प्रकारची ॲलर्जी असल्यास डॉक्टरांच्या सल्ल्याशिवाय कोणतीही अज्ञात वस्तू खाऊ नये. उन्हाळा आणि हिवाळा अशा दोन्ही हंगामात शेतकरी लाल भेंडीची लागवड करू शकतात ही चांगली गोष्ट आहे. फक्त लागवड करताना त्यात सिंचनाची कमतरता भासणार नाही याची विशेष काळजी घ्यावी लागते.

# पॉलिहाऊसमध्ये गुलाबाची लागवड करा आणि कमवा जास्तीचे पैसे

जर तुम्ही फळे आणि भाज्यांची लागवड करून कंटाळा करत असाल तर ही बातमी तुमच्यासाठी उपयुक्त आहे. फळे आणि भाजीपाला व्यतिरिक्त गुलाबाची लागवड करून शेतकरी भरघोस नफा कमवू शकतात. शेतकरी पॉलिहाऊसमध्ये डच गुलाबाची लागवड करू शकतात. या फुलाचे वेगळेपण आहे, तज्ज्ञांच्या मते, या फुलाचा रस उसाच्या रसापेक्षा कितीतरी पटीने गोड असतो.

यासोबतच बाजारातही भरपूर मागणी आहे. या फुलाचा वापर सजावटीसाठीही केला जातो. या फुलाची लागवड शेतकऱ्यांचे नशीब बदलू शकते. पॉलिहाऊसमध्ये या फुलाच्या लागवडीसाठी अनुदानही उपलब्ध आहे. तज्ज्ञांच्या मते, एक एकरमध्ये पॉलीहाऊस उभारण्यासाठी सुमारे ७० लाख रुपये खर्च येतो. ज्यावर राष्ट्रीय फलोत्पादन मंडळाकडून ५० टक्के अनुदान दिले जाते. या फुलाची लागवड फक्त पॉलीहाऊसमध्येच केली जाते. डच गुलाब वाढवण्यासाठी, पॉलीहाऊसमध्ये सुमारे ३२-३५ अंश सेल्सिअस तापमान असणे आवश्यक आहे. हिवाळ्यात पिकाची काढणी करणे फायदेशीर ठरते. डच गुलाबांना भारताबरोबरच जपान, नेदरलँड आणि ऑस्ट्रेलियासारख्या देशांमध्ये मागणी जास्त आहे.






# काळ्या हळदीपासून मोठी कमाई, जाणून घ्या त्याचे औषधी गुणधर्म...

काळी हळद : हळदीचे नाव ऐकताच तुमच्या मनात पिवळा रंग येतो पण तुम्हाला माहित आहे का की हळदीचा रंगही काळा असतो. या रंगाच्या हळदीचा बाजारभाव पिवळ्या हळदीपेक्षा खूप जास्त आहे. आयुर्वेदिक औषधे बनवण्यासाठी याचा वापर केला जातो. आम्ही तुम्हाला सांगतो की काळ्या हळदीमध्ये पिवळ्या हळदीपेक्षा जास्त जीवनसत्त्वे आणि खनिजे असतात.

काळ्या हळदीची लागवड मोकळ्या व चिकणमाती जमिनीत केली जाते. त्यासाठी कमी निचरा होणारी माती लागते. पावसावर अवलंबून असलेल्या भागात त्याची लागवड करणे अशक्य आहे. शेतकरी बांधवांनी लागवडीसाठी चांगली जागा निवडावी, जिथे सूर्यप्रकाश नियमित येत असावा.

यासोबतच शेतीसाठी शेतकऱ्यांनी अशा शेताची निवड करावी जिथे पाण्याचा निचरा करण्याची चांगली व्यवस्था असेल. काळ्या हळदीचा वापर वेगवेगळ्या प्रकारची औषधे बनवण्यासाठी केला जातो. दमा, अँटिऑक्सिडंट, अँटीफंगल, अँटी-कन्व्हलसंट, वेदनाशामक, बॅक्टेरियाच्या वाढीस प्रतिबंध करणारा पदार्थ आणि अल्सर यांसारख्या रोगांसाठी याचा वापर केला जातो. याशिवाय न्युमोनिया, खोकला, ताप, दमा यांसारख्या आजारांवरही हे देशी औषध वापरले जाते. बाजारात काळ्या हळदीची किंमत १००० ते ४००० रुपयांपर्यंत आहे. जर तुम्ही त्याची लागवड केली तर हा तुमच्यासाठी खूप फायदेशीर सौदा ठरू शकतो. काळ्या हळदीतील औषधी गुणधर्मामुळे बाजारात तिची मागणी आणि किंमत दोन्ही खूप जास्त आहे. एक हेक्टर शेतात लागवड केल्यास काळ्या हळदीचे सुमारे २ क्विंटल बियाणे पेरले जाईल. त्याच्या एक एकर शेतात सत्तर क्विंटलपर्यंत उत्पादन घेता येते आणि काळ्या हळदीची लागवड करून ४० ते ५० लाख रुपये सहज कमावता येतात. यामुळे ही हळद फायदेशीर आहे.

# आनंदाची बातमी! सप्टेंबरच्या पहिल्या आठवड्यात जोरदार पाऊस

ऑगस्ट महिना संपला तरी राज्यात अपेक्षित झाला नाही. त्यामुळे शेतकरी चिंतेत आहेत. त्यातच हवामान खात्याने आज (दि.३१) नवा पावसाचा अंदाज व्यक्त केला आहे. यामुळे शेतकऱ्यांना दिलासा मिळू शकतो. सप्टेंबर महिन्याच्या पहिल्या आठवड्यामध्ये पावसाला सुरुवात होण्याची शक्यता आहे. तर सप्टेंबरमध्ये मध्यापर्यंत चांगला पाऊस पडू शकतो, असा अंदाज हवामान विभागाने व्यक्त केला आहे.

सप्टेंबर महिन्यात मराठवाडा आणि कोकणाच्या काही भागांत चांगला पाऊस होऊ शकतो, असंही हवामान खात्याने म्हटले आहे.

ऑगस्ट महिना संपला तरी राज्यात पावसाने हजेरी लावली नाही. त्यामुळे शेतकरी चिंतेत आहेत. पाण्याअभावी पीके सुकण्याच्या मार्गावर आहेत. सध्या पिकांना पाण्याची जास्त गरज आहे. याच दरम्यान हवामान खात्याने सप्टेंबर महिन्यात चांगल्या पावसाचा अंदाज दिल्याने शेतकऱ्यांना दिलासा मिळण्याची शक्यता आहे.

सप्टेंबर महिन्यात पाऊस झाल्यास शेतकऱ्यांना दिलासा देण्याची शक्यता आहे. कोकण आणि गोव्यातही चांगला पाऊस होण्याचा अंदाज आहे. महाराष्ट्रासह मध्य भारतातही पावसाला सुरुवात होऊ शकते. कर्नाटक आणि केरळ राज्यातही पावसाचा अंदाज आहे, असंही हवामान शास्त्रज्ञ यांनी म्हटलं आहे.

दरम्यान, ऑगस्ट महिन्यात मोठ्या प्रमाणात पावसाने उघडीप दिली आहे. पण आता सप्टेंबर महिन्यात पाऊस सुरु होईल, असा अंदाज हवामान खात्याने वर्तविला आहे.

# या जिल्ह्यातील शेतकऱ्यांना मिळणार पहिल्याच टप्प्यात संपूर्ण कांदा अनुदान

हंगामामध्ये कांद्याने शेतकऱ्यांची पुरती निराशा केली. अतिशय कवडीमोल दरामध्ये शेतकऱ्यांचा कांदा खरेदी केला गेला व त्यामुळे शेतकऱ्यांना खूप मोठ्या प्रमाणावर आर्थिक फटका बसला. उत्पादन खर्च सुद्धा शेतकऱ्यांचा निघाला नाही. त्यामुळे शेतकरी प्रचंड प्रमाणात आर्थिक संकटात सापडल्याचे दिसून आले होते. त्यामुळे या प्रश्र्नावर शेतकऱ्यांनी आंदोलने देखील केली होती व हा प्रश्र्न विधानसभेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनामध्ये देखील गाजला होता.

त्यामुळे राज्य सरकारने कांदा उत्पादक शेतकऱ्यांना दिलासा देण्याकरिता साडेतीनशे रुपये प्रति क्विंटल अनुदान हे २०० क्विंटल मर्यादेपर्यंत निश्र्चित केले आहे. ज्या शेतकऱ्यांनी एक फेब्रुवारी २०२३ ते ३१ मार्च २०२३ या कालावधीत राज्यातील ज्या कृषी उत्पन्न बाजार समिती किंवा खाजगी बाजार समिती आणि नाफेड कडे कांद्याची विक्री केलेली आहे असे शेतकरी याकरिता पात्र आहेत.

कांदा अनुदानाची सगळी घोषणा वगैरे होऊन सहा महिन्यांचा कालावधी गेला परंतु अजून देखील शेतकऱ्यांना अनुदानाचा लाभ मिळालेला नाही. परंतु राज्य शासनाच्या वित्त विभागाच्या माध्यमातून नुकतेच कांदा अनुदाना करिता ८५७ कोटी रुपये मंजूर करण्यात आले होते व त्यापैकी ४६५ कोटी ९० लाख रुपयांचा निधी हा अनुदान वितरणाकरिता राज्याच्या पणन विभागाकडे सुपूर्द करण्यात आला आहे.

कांदा अनुदानासाठी जे काही राज्यातील पात्र ठरलेले जिल्हे आहेत त्यामधील १३ जिल्ह्यातील शेतकऱ्यांना कांदा अनुदानाची शंभर टक्के रक्कम पहिल्याच टप्प्यात देण्यात येणार आहे तर उर्वरित दहा जिल्ह्यातील कांदा उत्पादक शेतकऱ्यांना ही अनुदानाचे रक्कम दोन टप्प्यात देण्यात येणार आहे.

यामध्ये ज्या जिल्ह्याचे कांदा अनुदानासाठी द्यायची रक्कम दहा कोटी रुपयांपेक्षा कमी आहे अशा १३ जिल्ह्यातील शेतकऱ्यांना संपूर्ण रक्कम वितरित केली जाणार आहे. तसेच ज्या शेतकऱ्यांची कांदा अनुदानाची रक्कम दहा कोटी रुपयांपेक्षा जास्त आहे. अशा शेतकऱ्यांकरिता दहा जिल्ह्यातील शेतकऱ्यांना अनुदानाची रक्कम दोन टप्प्यात मिळणार असल्याची माहिती समोर आली आहे.

**या जिल्ह्यातील शेतकऱ्यांना मिळणार १००% रक्कम**



राज्यातील जालना, वाशिम तसेच अकोला, यवतमाळ, नागपूर, रायगड, सातारा, सांगली, ठाणे, अमरावती, बुलढाणा, नागपूर, लातूर या जिल्ह्यातील शेतकऱ्यांना शंभर टक्के अनुदान मिळणार आहे. तसेच राज्यातील धुळे, कोल्हापूर तसेच औरंगाबाद, उस्मानाबाद, बीड, जळगाव, पुणे, सोलापूर, नाशिक आणि अहमदनगर या प्रमुख कांदा उत्पादक जिल्ह्यातील शेतकऱ्यांना ही अनुदानाची रक्कम दोन टप्प्यात विभागून देण्यात येणार आहे. यामध्ये ज्या शेतकऱ्यांची अनुदानाचे रक्कम हे दहा हजार पेक्षा अधिक आहे अशा शेतकऱ्यांना पहिल्या टप्प्यांमध्ये दहा हजार रुपये एवढी रक्कम मिळणार असल्याची माहिती देखील समोर आली आहे.

लातूर
# भूकंप
http://epaper.dainikbhukamp.com

LATUR BHUKAMP | शनिवार २ सप्टेंबर २०२३



## बसवेश्वर महाविद्यालयाचा संघ अविभागीय बॅडमिंटन स्पर्धेत सर्वप्रथम

लातूर : स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड आणि दयानंद वाणिज्य महाविद्यालय, लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित विद्यापीठस्तरीय अविभागीय बॅडमिंटन स्पर्धेत महात्मा बसवेश्र्वर महाविद्यालयाचा संघ प्रथम आला आहे. या संघामध्ये माळी आदित्य अनिल कुमार (बीएसडब्ल्यू प्रथम वर्ष), आयरेकर प्रशांत (बीए प्रथम वर्ष), जाधव वरद उदय (प्रथम वर्ष), महानवर ज्ञानेश्र्वर शेषेराव (बीए प्रथम वर्ष), आकाश गड्डे बी. ए. (प्रथम वर्ष), बेंड्रीकर रघुनाथ भारत (बीकॉम द्वितीय वर्ष) या सर्व खेळाडूंचा सहभाग होता. या स्पर्धेमध्ये एकूण १३ संघ सहभागी झाले होते

## लातूर जिल्ह्यात शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश जारी

लातूर : जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था, सार्वजनिक शांतता व सुरक्षितता अबाधित राखण्यासाठी अपर जिल्हादंडाधिकारी विजयकुमार ढगे यांनी मुंबई पोलीस अधिनियम १९५१ च्या कलम ३७ (१) (३) अन्वये लातूर जिल्ह्याच्या संपूर्ण हद्दीत शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश जारी केले आहेत. हा आदेश संपूर्ण लातूर जिल्ह्याच्या हद्दीत १ सप्टेंबर २०२३ रोजीच्या ००.०१ वाजेपासून ते १५ सप्टेंबर २०२३ रोजीच्या २४.०० वाजेपर्यंत (दोन्ही दिवस धरुन) लागू राहील. या आदेशान्वये शस्त्रे, सोटे, तलवारी, भाले, दंडे, बंदुका, सुरे, काठ्या, लाठ्या किंवा शारीरिक इजा करण्यासाठी वापरता येईल, अशी कोणतीही वस्तू सोबत घेऊन फिरता येणार नाही. व्यक्तीचे प्रेत, आकृत्या व प्रतिमा यांचे प्रदर्शन करता येणार नाही. जाहीरपणे घोषणा, गाणे म्हणणे, वाद्य वाजविणे यास प्रतिबंध राहील. तसेच कोणत्याही रस्त्यांवर किंवा कोणत्याही एका ठिकाणी पाच किंवा अधिक व्यक्तींना एकत्र जमण्यास किंवा मिरवणूक काढण्यास मनाई करण्यात आली आहे. हा आदेश धार्मिक सभा, अंत्ययात्रा, विवाह, अधिकारी, कर्मचारी यांना लागू राहणार नाही, असे अधिसूचनेत नमूद करण्यात आले आहे.

# लातूर जिल्ह्यात ९ सप्टेंबर रोजी राष्ट्रीय लोक अदालतीचे आयोजन

लातूर : महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरणच्या आदेशानुसार ९ सप्टेंबर २०२३ रोजी लातूर येथे तसेच जिल्ह्यातील सर्व तालुका न्यायालयामध्ये राष्ट्रीय लोक अदालतीचे आयोजन करण्यात आले आहे. या लोक अदालतीमध्ये अधिकाधिक पक्षकारांनी सहभागी होवून न्यायालयात दाखल असलेली प्रलंबित प्रकरणे तसेच दाखलपूर्व प्रकरणे तडजोडीने निकाली काढावीत, असे आवाहन प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा जिल्हा विधी सेवा प्राधिकरण अध्यक्षा सुरेखा कोसमकर आणि सचिव श्रीमती एस. डी. अवसेकर यांनी केले आहे.

लातूर जिल्हा मुख्यालयासह जिल्ह्यातील सर्व तालुकास्तरीय न्यायालयामध्ये घेण्यात येत असलेल्या राष्ट्रीय लोक अदालतीमध्ये तडजोडपात्र फौजदारी प्रकरणे, मोटार अपघात, भू-संपादन, १३८ एन. आय. ॲक्ट, कौटुंबिक प्रकरणे, बँक वसुली प्रकरणे, कामगार, सहकार न्यायालय, वीज व पाणी बिल प्रकरणे, पगार व भत्ते प्रकरणे आणि सेवानिवृत्ती विषयक प्रकरणे, महसूल प्रकरणे व इतर दिवाणी प्रकरणे शिवाय वादपूर्व प्रकरणांमध्ये कलम १३८ एन. आय. ॲक्ट प्रकरणे, बँक वसुली प्रकरणे, कामगार वाद प्रकरणे, वीज व पाणी बिल प्रकरणे, दूरध्वनी तथा मोबाईल कंपन्यांची प्रकरणे अशा सर्व प्रकारची तडजोडयोग्य प्रकरणे ठेवण्यात येणार आहेत.

राष्ट्रीय लोक अदालतीमध्ये भूसंपादनाची प्रकरणेही तडजोडीसाठी ठेवण्यात येणार असून संबंधित शासकिय भू-संपादन विभागाकडून सकारात्मक प्रतिसाद मिळणार आहे. त्यामुळे संबंधित पक्षकारांनी आपल्या वकिलांशी त्वरीत संपर्क करून त्यांच्या भू-संपादनाची प्रकरणे राष्ट्रीय लोक अदालतीमध्ये ठेवण्यासाठी प्रयत्न करावेत. तसेच अपघात दावा प्रकरणांमध्येही संबंधित विमा कंपन्यांची जास्तीत जास्त प्रकरणे तडजोडीने मिटविण्यासाठी प्रयत्न होणार आहेत त्यामुळे ज्या पक्षकारांची अपघात दावा प्रकरणे प्रलंबित आहेत त्यांनी आपापली प्रकरणे तडजोडीने मिटवून घेण्यासाठी संबंधित वकिलांशी व न्यायालयाशी संपर्क साधावा. त्याचप्रमाणे कौटुंबिक, दिवाणी व तडजोडपात्र फौजदारी प्रकरणे राष्ट्रीय लोक अदालतीच्या माध्यमातून मिटविण्यासाठी पक्षकारांनी पुढाकार घ्यावा.

लोक अदालत यशस्वी करण्यासाठी सर्व पक्षकार, विधिज्ञ व संबंधित अधिकाऱ्यांनी सहकार्य करावे, असे आवाहन प्रमुख जिल्हा न्यायाधीश तथा जिल्हा विधी सेवा प्राधिकरणच्या अध्यक्ष सुरेखा कोसमकर, प्राधिकरणच्या सचिव श्रीमती एस. डी. अवसेकर, जिल्हा राकारी वकील ॲड. संतोष देशपांडे, जिल्हा विधिज्ञ मंडळाचे अध्यक्ष ॲड. महेश बामनकर यांनी केले आहे.

# ड्रोनच्या सहाय्याने पकडली २ कोटींची वीजचोरी



मुंबई : वीजबिलाच्या थकबाकीसाठी बंद केलेल्या मीटरला बायपास करुन उच्चदाबाच्या रोहित्राला थेट मोठी केबल जोडून वीजचोरी करणाऱ्या चोराचा महावितरण केडगाव विभागाने ड्रोनच्या सहाय्याने छडा लावला आहे. मुकेश अगरवाल असे या वीजचोराचे नाव असून त्यास महावितरणने २ कोटी ४ लाखांचा दंड ठोठावला आहे. याप्रकरणी शिक्रापूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सणसवाडी (ता. शिरुर) येथे श्री. मुकेश ओमप्रकाश अगरवाल (रा. अग्रसेन सोसायटी, कोरेगाव पार्क, पुणे) यांच्या मालकीच्या तीन वेगवेगळ्या कंपन्या आहेत. पैकी मे. थर्मोलाईट पॅकेजिंग इंडिया प्रा.लि व मे. प्रकाश करुगेटेडे पुणे प्रा.लि ह्या दोन उच्चदाबाचे तर मे. भगवान ट्यूब प्रा.लि. हे लघुदाब ग्राहक आहेत. तिन्ही कंपन्या एकाच आवारात व शेजारी-शेजारी आहेत. यामध्ये प्रामुख्याने थर्माकोल व पुठ्ठा बनविण्याचे काम होते. मे. थर्मोलाईट पॅकेजिंग इंडिया प्रा.लि या ग्राहक जोडणीचा वीजपुरवठा कायमस्वरुपी बंद केला होता तर इतर दोन वीजजोडण्यांचा वीजपुरवठा देखील थकबाकीच्या कारणास्तव तात्पुरता बंदच आहे.

महावितरणने वीजपुरवठा बंद केलेला असतानाही वीजपुरवठ्यासाठी उभारण्यात आलेल्या उच्चदाब रोहित्रातून थेट वीजपुरवठा सुरु केल्याची माहिती केडगावचे कार्यकारी अभियंता संदीप दरवडे यांना खबऱ्यामार्फत मिळाली. सदरची वीजचोरी मोठी असल्याने व संबंधित ग्राहकाने गेटवर बंदोबस्त लावून आत जाण्यास मज्जाव केल्याने दरवडे यांनी ही बाब मुख्य अभियंता सुनिल पावडे यांच्या कानावर घातली. तेव्हा मुख्य अभियंता पावडे यांनी वीजचोरी उघडकीस आणण्यासाठी ड्रोनची मदत घेण्यास सांगितले. २५ ऑगस्टला संदीप दरवडे आठ जणांच्या पथकासह गेले. कुरिअर पार्सल देण्याच्या निमित्ताने एका दुचाकीवरुन त्यांनी एका मित्राच्यासह आत प्रवेश मिळवला. पुराव्यासाठी ड्रोनद्वारे चित्रिकरण सुरु केले व तोच बाहेर दबा धरुन बसलेल्या टीमने ओळखपत्र दाखवून आत प्रवेश केला आणि वीजचोरीचा पर्दाफाश केला.

मे. प्रकाश करुगेटेड पुणे प्रा.लि (ग्रा.क्र. १८४८१९०४९४४०) या ग्राहकाला ४७३२९० युनीट वीजचोरी पोटी १ कोटी ११ लाख १९ हजार ८५७, मे. थर्मोलाईट पॅकेजिंग इंडिया प्रा.लि. (ग्रा.क्र. १८४८१९०२१८९२) या ग्राहकाला २०५६०६ युनीट चोरीचे ५१ लाख ३४ हजार ९७० तर मे.श्री. भगवान ट्यूब प्रा.लि (ग्रा.क्र. १८४८१९०३३४४०) या ग्राहकाला २३४९६१ युनीट चोरीसाठी ४२ लाख २५ हजार १६४ रुपये असे तीन ग्राहकांचे मिळून २ कोटी ४ लाख ७९ हजार ९८८ रुपये दंडाचे बील कंपनीचे मालक मुकेश ओमप्रकाश अगरवाल यांना देण्यात आले आहे. तसेच कार्यकारी अभियंता दरवडे यांच्या फिर्यादीवरुन भारतीय विद्युत अधिनियम २००३ कलम १३५ व १३८ नुसार शिक्रापूर पोलीस ठाण्यात वीजचोरीचा व वीज यंत्रणेस छेडछाड केल्याचा गुन्हा सुद्धा दाखल करण्यात आला आहे.

मुख्य अभियंता सुनिल पावडे, अधीक्षक अभियंता म्हसू मिसाळ यांचे मार्गदर्शनाखाली कार्यकारी अभियंता संदीप दरवडे, अतिरिक्त कार्यकारी अभियंता किशोर शिंदे, उपकार्यकारी अभियंता नितीन महाजन, सहा. अभियंता गौरी काळंगे व बाळासाहेब टेंगले, कनिष्ठ अभियंता श्रीकांत ताटीकोंडा, जनमित्र विश्र्वनाथ किंदरे व ज्ञानेश्र्वर आहिरकर यांनी ही कामगिरी यशस्वी केली. महावितरणने पकडलेल्या या वीजचोरीमुळे वीजचोरांचे धाबे दणाणले आहेत.

# उदगीर शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत तासिका तत्वावर होणार शिल्प निदेशाकाची नेमणूक

## १५ सप्टेंबरपर्यंत अर्ज सादर करण्याचे आवाहन

लातूर : उदगीर येथील औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत रिक्त पदावर तात्पुरत्या स्वरुपात तासिका तत्वावर शिल्प निदेशकाची नेमणूक करण्यात येणार आहे. यासाठी इच्छुक उमेदवारांनी १५ सप्टेंबर २०२३ रोजी सायंकाळी ५ वाजेपर्यंत आपले अर्ज स्वतः उदगीर औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्या कार्यालयात सादर करण्याचे आवाहन संस्थेचे प्राचार्य यांनी केले आहे

जोडारी (फिटर) तुकडी संख्या २, मोटार मेकॅनिक (एमएमव्ही) तुकडी संख्या २ आणि संधाता (वेल्डर) तुकडी संख्या १ याकरिता निदेशाकाची नेमणूक करण्यात येणार आहे. यासाठी अभियांत्रिकी पदवी, एक वर्ष अनुभव किंवा अभियांत्रिकी पदविका आणि दोन वर्षे अनुभव आवश्यक आहे. आयटीआय आणि सीआयटीएसमधील दोन वर्षाचा अथवा आयटीआय आणि अप्रेंटशिपचा तीन वर्षाचा अनुभव या पदांसाठी आवश्यक आहे.

संबंधित व्यवसायाच्या शिक्षकीय पदाची पात्रता संबंधित व्यावसायाच्या शाखेप्रमाणे राहील. तसेच संबंधित क्षेत्रातील पदांच्या अनुभवी उमेदवारास प्राधान्य देण्यात येईल. या पदांसाठी १५ नोव्हेंबर, २०१८ रोजीच्या शासन निर्णयानुसार तासिका मानधन देण्यात येईल. १५ सप्टेंबर २०२३ रोजी सायंकाळी ५ वाजेपर्यंतच अर्ज स्वीकारले जातील. त्यानंतर आलेले कोणतेही अर्ज स्वीकारले जाणार नाहीत, असे उदगीर औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे कळविले आहे.

# राज्य पातळीवरील देशभक्तीपर गीत गायन स्पर्धेत लातूरच्या पंचकन्यांची बाजी

लातूर : कै. देविदासराव वामनराव कुलकर्णी स्मृति जपश्रळपश प्रेरक राष्ट्रभक्तीपर गीत गायन स्पर्धा २०२३ ऑनलाईन पद्धतीने आयोजीत केली होती या स्पर्धे मध्ये लातूरच्या पंचकन्यांनी बाजी मारली व पुन्हा एकदा लातूर पॅटर्न कलाक्षेत्रात ही कसा अग्रेसर आहे हे दाखवून दिले.

या स्पर्धेमध्ये फक्त तानपुरा सोबत हे देशभक्तीपर गीत गायली आहेत व शालेय गटातून उन्नती मुंढे प्रथम, अपूर्वा पाटील द्वितीय, रिदम पाटील तृतीय आणि महाविद्यालयीन गटामधून शर्वरी डोंगरे प्रथम व कमलाक्षी कुलकर्णी द्वितीय विशेष म्हणजे या सर्व संगीत साधक लातूरच्या आरोह संगीत अकादमीच्या विद्यार्थिनी आहेत आजपर्यंत महाराष्ट्रात व महाराष्ट्रावरील अनेक स्पर्धांमध्ये या संगीताकादमीच्या विद्यार्थ्यांनी आपला एक वेगळा ठसा उमटवला आहे.

या स्पर्धेमधील महाराष्ट्रातील अनेक शहरांमधून जवळपास दीडशे स्पर्धकांनी सहभाग नोंदवला होता, या स्पर्धेचे आयोजन अंबाजोगाई येथील भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेच्या श्री खोलेश्र्वर विद्यालयाचे संगीत शिक्षक व गायक कलावंत जयेंद्र कुलकर्णी यांनी केले होते. या स्पर्धेचे परीक्षण भुसावळ येथील तज्ञ अभ्यासू परीक्षक किरण मनोहर सोहळे, यांनी केले. या सर्व संगीत साधकांना लातूरच्या आरोह संगीत अकादमीचे संचालक प्रा. शशिकांत देशमुख व डॉ. वृषाली देशमुख यांनी मार्गदर्शन केले आहे. या स्पर्धेतील सर्व विजेत्यांचे अभिनंदन श्री.शेषाद्री अण्णा डांगे, अभय शहा, डॉ. रविराज पोरे, डॉ. संदिपान जगदाळे श्री दिनकर पाटील श्री हरिसर्वोत्तम जोशी श्री किरण भावठाणकर इत्यादी अनेक मान्यवरांनी केले आहे.

# विभागीय अधिस्वीकृती समिती अध्यक्षपदी विजयकुमार जोशी यांची बिनविरोध निवड

लातूर : लातूर विभागीय अधिस्वीकृती समिती - २०२३ ची पहिली बैठक आज लातुरच्या शासकीय विश्रामगृहाच्या सभागृहात पार पडली. या बैठकीत समितीच्या अध्यक्षपदी पत्रकार विजयकुमार जोशी यांची बिनविरोध निवड करण्यात आली. लातूर जिल्हा माहिती अधिकारी युवराज पाटील यांनी निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून काम पाहिले.

या बैठकीस माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या लातूर विभागाच्या उपसंचालक डॉ.सुरेखा मुळे, विभागीय अधिस्वीकृती समितीचे सदस्य सर्वश्री अमोल अंबेकर, अझरोद्दीन रमजान शेख, नरसिंह घोणे, प्रल्हाद उमाटे, यांच्यासह नांदेड जिल्हा माहिती अधिकारी विनोद रापतवार, उस्मानाबाद जिल्हा माहिती अधिकारी विवेक खडसे, हिंगोली जिल्हा माहिती अधिकारी अरूण सूर्यवंशी, लातूर विभागीय माहिती कार्यालयाचे सहायक संचालक डॉ. श्याम टरके, माहिती अधिकारी तानाजी घोलप, उपसंपादक रेखा गायकवाड आदी उपस्थित होते.




उपसंचालक डॉ.मुळे यांनी नवनियुक्त अध्यक्ष श्री. जोशी व समिती सदस्यांचे शाल, पुष्पगुच्छ, ग्रंथ भेट देऊन स्वागत केले. अधिस्वीकृती समितीचे नवनियुक्त अध्यक्ष श्री. जोशी यांनी शासकीय अधिकारी व समिती सदस्यांच्या समन्वयातून अधिकाधिक पत्रकारांना न्याय देऊ. विभागीय अधिस्वीकृती समितीवर माझी पहिल्यांदाच निवड झाली. सर्व समिती सदस्यांच्या परस्पर सहकार्यातून सकारात्मकदृष्टीने काम करण्याचा त्यांनी मनोदय व्यक्त केला. पात्र असलेल्या पत्रकारांना अधिस्वीकृती पत्रिका देण्यासाठी समिती सदैव तत्पर राहील, असेही त्यांनी स्पष्ट केले. समितीचे सदस्य श्री. उमाटे, श्री. शेख यांनीही यावेळी मनोगत व्यक्त केले.

## CHANGE OF NAME DECLARATION

HERE IN THIS ADVERTISE I AM DECLARING THAT I HAVE CHANGE MY NAME WHICH WAS EARLIER : **QUADRI SYED JAWAD TO : QUADRI SYED JAUVAD SYED JAFAR** HENCE FOR THIS DECLARATION I WILL BE KNOWN BY THIS NAME AND WILL USE **QUADRI SYED JAUVAD SYED JAFAR** IN FUTURE THE SAME NAME WILL BE USED BY MY FAMILY WIFE/ CHILDREN AND RELATIVE.

**OLD NAME :- QUADRI SYED JAWAD**
**NEW NAME :- QUADRI SYED JAUVAD SYED JAFAR**
**ADDRESS :- JALKOT ROAD QUSIMPURA UDGIR DIST.LATUR MS**

## CHANGE OF NAME DECLARATION

HERE IN THIS ADVERTISE I AM DECLARING THAT I HAVE CHANGE MY NAME WHICH WAS EARLIER : **BODHANAKAR SANTOSH PREMACHANDRA TO : SANTOSH PREMCHANDRA BODHANKAR** HENCE FOR THIS DECLARATION I WILL BE KNOWN BY THIS NAME AND WILL USE **SANTOSH PREMCHANDRA BODHANKAR** I N FUTURE THE SAME NAME WILL BE USED BY MY FAMILY WIFE/ CHILDREN AND RELATIVE.

**OLD NAME :- BODHANAKAR SANTOSH PREMACHANDRA**
**NEW NAME :- SANTOSH PREMCHANDRA BODHANKAR**
**ADDRESS :- SANMITRA COLONY, DEGLOOR ROAD, UDGIR, DIST. LATUR MS**

## CHANGE IN NAME

I have change my name KHADRI NISARULLAH KHUDRATULLAH to KHADRI NISARULLA KHUDRATULLAH henceforth this declaration and will be known by this name. I will use KHADRI NISARULLA KHUDRATULLAH in future. The same name will be used by my husband / wife, children and family.

OLD NAME : KHADRI NISARULLAH KHUDRATULLAH
NEW NAME : KHADRI NISARULLA KHUDRATULLAH
ADDRESS : Ashiyana Manzil, Behind Head Post Office, Latur (M.S) - 413512

## CHANGE IN NAME

I have change my name PATEL ZULFEQAR IFTEKHAR to PATEL ZULFEQUAR IFTEKHAR henceforth this declaration and will be known by this name. I will use PATEL ZULFEQUAR IFTEKHAR in future. The same name will be used by my husband / wife, children and family.

OLD NAME : PATEL ZULFEQAR IFTEKHAR
NEW NAME : PATEL ZULFEQUAR IFTEKHAR
ADDRESS : Khori Galli, Latur (M.S.) - 413512

## जाहीर प्रगटन

या जाहीर प्रगटनानुसार नागरीकांना कळविण्यात येते की खालील यादीप्रमाणे लातूर महानगरपालिका, लातूर प्लॉट घेणाऱ्यांनी नामांतरासाठी अर्ज दाखल केला आहे. तरी सदरील नामांतराबाबत नागरीकांच्या सुचना किंवा हरकती असेल त्यांना हे प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून सात (७) दिवसाच्या आत लातूर महानगरपालिका आयुक्त यांचेकडे लेखी स्वरूपात नाहरकत दाखल कराव्यात तर कोणतेही हरकती आल्या नाही तर नामांतर मंजूर करून त्याप्रमाणे नाव लावण्याचे कार्यवाही करण्यात येईल.

**अ. क्र. ५९५ ते ६१९**

| क्र. | जागा खरेदी करणाऱ्याचे नाव | जागा विक्री करणाऱ्याचे नाव | सर्वे नंबर | घर क्रमांक | क्षेत्रफळ |
|---|---|---|---|---|---|
| १ | मारूती भरत पवार | मेघा मारूती पवार | ९८८४ | A4-3573-1 | ५६.६२ चौ. मी. |
| २ | मुकीद अहेमद फरोदीन | निलोफर जाकीर शेख व इतर | ५७ | A1-4854-6 | ४०० चौ. फु. |
| ३ | शकुंतला त्र्यंबकअप्पा कडगे | सौ. मिनाक्षी संजय कडगे | ७३-२ | A1-998 | ३९६० चौ. फु. |
| ४ | जैतुनबी मुस्तफा शेख | जरीना समद शेख | २४०-२१ | A5-2986 | ७८६.७७ चौ. फु. |
| ५ | सौ. हिराबाई चंद्रशेखर तांदळे | श्याम गंगाधर धुर्वे | १७-अ-१ | A3-346-2 | १०५० चौ. फु. |
| ६ | गणेश पंडीत गावकरे | प्रकाश शामराव धुर्वे | १७-अ-१ | A3-571 | ९२.९३ चौ. मी. |
| ७ | विवेकानंद भानुदास थोरमोटे | सौ. स्नेहल नितीन कांबळे | ५७ | A5-5738 | १३५ चौ. फु. |
| ८ | धर्मेंद्र गुलाबराव शिंदे | अमोल भीमाशंकर वद्रे व इतर | ३८-७ | A2-1935-9 | २९७.३९ चौ. मी. |
| ९ | पंढरी लक्ष्मण बरूरे | बालाजी पंढरीनाथ बरूरे | - | - | २९०० चौ. फु. |
| १० | भानुदास अंबाजी सोलंकर | गोविंद हरिश्चंद्र बिराजदार | २३६-१ | A5-718-26 | १२०० चौ. फु. |
| ११ | बिभिषण चंद्रकांत वाबळे | शामसिंग किसनसिंग ठाकुर | ११७ | A5-6382-40 | २५२४.८ चौ. फु. |
| १२ | सुमन दिलीप पाटील | पुजा अतुल भोपे | ७७-३-अ | A1-152-23 | २००५ चौ. फु. |
| १३ | दयानंद इराप्पा सुर्यवंशी | सौ. शुभांगी दिगंबर राऊत | ३७-४-क | A2-2540 | १००० चौ. फु. |
| १४ | लता नानासाहेब बोराडे | शामल विठ्ठल सातपुते | ५७ | A1-2234-1 | ५१० चौ. फु. |
| १५ | लक्ष्मण उद्धवराव देबडवार | संजय लक्ष्मण देबडवार | ५७ | A1-3513 | ७५० चौ. फु. |
| १६ | मयुर यशवंतराव पाटील | अशोक जोतीराम गुरदळे | ५९-१-अ | A1-5355 | २०९१.५० चौ. फु. |
| १७ | नाथ मारोतीराव रेड्डी | सुहास शिवशंकरअप्पा कल्याणी | २३ | A5-6746-1 | २७५० चौ. फु. |
| १८ | विश्वनाथ बापुराव पांचाळ | मल्हारी दगडु बनसोडे | ३७-२-ब | A2-2155-4 | ४६.४६ चौ. मी. |
| १९ | साधना गोविंदराव देशमुख | निलेश गुंडाप्पा पाटील | ७३-२ | A1-1242 | ३३१.३ चौ. मी. |
| २० | युनुस सिकंदर शेख इतर | महमदरसुल अब्दुलहमीद पटेल | ११५ | A5-3676-1 | ९२.९३ चौ. मी. |
| २१ | अजगरीबानु जलील अ. फारूकी | मतीन जलील अहमद फारूकी | ३७ | A2-2346 | ९०० चौ. फु. |
| २२ | रशीद अ. खय्युम शेख | मुजमील रशिदमिया शेख | ६१-३-क | A1-3912-2 | १२२४ चौ. फु. |
| २३ | गयाबाई अंतराम गरड | राजाभाऊ अंतराम गरड व इतर | ३८-३-क | A2-2980 | १७३.२५ चौ. मी. |
| २४ | रणजीत बाबुराव चव्हाण | निर्मलाबाई सुभाष मोरे | १४-१-ब-१ | A3-2635-1 | ७९२ चौ. फु. |
| २५ | अशीया वसीम शेख | रेखा सुनील सुनेवार | २३७-अ-१ | A5-1476 | २४९.७ चौ. मी. |

स्वाक्षरीत/-
क्षेत्रीय अधिकारी
क्षेत्रीय कार्यालय ए
लातूर महानगरपालिका, लातूर

छोटी झेरॉक्स मशीन व प्रिंटर विक्री
कलर प्रिंट/झेरॉक्स
B/W प्रिंट/झेरॉक्स
जम्बो झेरॉक्स/प्रिंट
डिझाईनिंग/पासपोर्ट फोटो
रिफीलींग/टोनर/फोटो पेपर
लॅमिनेशन मशिन व मटेरिअल
झेरॉक्स मशीनचे अधिकृत विक्रेते :
बोरा झेरॉक्स
व्यापारी धर्मशाळा, महात्मा गांधी चौक, लातूर.
9673344777

श्री.तिरूपती ट्रेडींग कंपनी
शिवाजी चौक, निलंगा, जि. लातूर
जैन ठिबक सिंचन
जैन स्प्रिंकलर
जैन पी.व्ही.सी.पाईपचे
-: अधिकृत विक्रेते:-
प्रो. गुणवंत गायकवाड हलगरकर
फोन:-दु. २४२४६३, मो.९४०४६८२९९९



SINCE 1972
माळवदकर एजन्सीज
सावेवाडी, लातूर
mo. 9422656522
सर्व प्रकारच्या फर्निचरचे उत्पादक व विक्रेते